# रोजगार हमी योजना

### पार्श्वभूमी

राज्यसंस्थेने प्रत्येक नागरिकाला निर्वाहाचे साधन अथवा रोजगार मिळण्याचा हक्क प्राप्त करून देण्याबद्दल प्रयत्नशील रहावे असे भारताच्या घटनेच्या परिच्छेद ४१ मध्ये सांगितले आहे महाराष्ट्रातील रोजगारहमीयोजनेमागे देशाच्या संविधानात प्रतिपादिलेले हे मार्गदर्शक तत्त्व आहे.

ग्रामीण भागातील व्यक्तींना रोजगार पुरवावा म्हणून प्रथम १९६९ साली पागे योजनेत रोजगारहमी योजना समाविष्ट केली होती. ही योजना राज्यातील काही जिल्ह्यांत प्राथमिक स्वरूपात राबविण्यात आली. या अनुभवावरून दिनांक २८ मार्च १९७२ पासून ग्रामीण भागात सर्वत्र या योजनेअंतर्गत रोजगाराची हमी जाहीर करण्यात आली. अशाप्रकारे प्रगतीचा एक टप्पा गाठण्यात आला. १९७२ मध्ये महाराष्ट्र शासनाने स्वीकारलेल्या १५ कलमी कार्यक्रमांत रोजगार हमीयोजनेचा समावेश करण्यात आला.

योजनेच्या सुरुवातीच्या काळात म्हणजे १९७२ ते १९७४ मध्ये महाराष्ट्र राज्यात अभूतपूर्व दुष्काळ पडला. तेव्हा रोजगारहमीयोजनेची कामे शासनाने निलंबीत केली म्हणजे थांबवली. मोठ्या प्रमाणावर दुष्काळी कामे सुरू केली. १९७४-७५ साली पुनः सर्वत्र ही योजना सुरू करण्यात आली. बेरोजगाराला रोजगाराची हमी मिळवून देण्याच्या दिशेने संबंध भारतात महाराष्ट्र राज्यनेच प्रथम पाऊल टाकले.

२९ सप्टेंबर १९७४ रोजी विधान परिषदेचे सभापती श्री. वि. स. पागे यांनी सर्व पक्षीय प्रतिनिधींची एक बैठक घेतली. या योजनेचा सर्वसाधारण आराखडा या बैठकीत निश्चित करण्यात आला. या आराखड्यानुसार २० डिसेंबर १९७४ रोजी मुख्यमंत्र्यांनी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात निवेदन केले. या योजनेसाठी लागणाऱ्या निधीसाठी खास कर आकारण्यात यावा अशी सूचनाही या निवेदनात होती. उभय सभागृहानी या प्रस्तावाला एकमुखी पाठिंबा दिला.

रोजगारहमीयोजनेत "मागेल त्याला काम व कामाप्रमाणे दाम" हे तत्त्व अवलंबले आहे. महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ हा २६ जानेवारी १९७९ पासून अंमलात आला आहे. अशा प्रकारे या योजनेला कादेशीर स्वरूप प्राप्त झाले. या योजनेखाली अकुशल बेरोजगारांना त्यांच्या मागणीप्रमाणे रोजगार उपलब्ध केला जावा अशी तरतूद आहे. या योजनेनुसार शेती उत्पादनात वाढ होण्याऱ्या कार्यक्रमांची अंमलबजावणी होते. अशा रीतीने स्थायी स्वरूपाची संपत्ती मोठ्या प्रमाणात निर्माण करण्यात येत असल्यामुळे या योजनेने देशातील इतर राज्यांचे सुध्दा लक्ष वेधून घेतले आहे.

### योजनेचा उद्देश व हेतू

सर्व ग्रामीण भागाला ही योजना लागू होते. तसेच "क" वर्गीय नगरपालिका क्षेत्रालाही ती लागू आहे. कामाची गरज असले त्या, कष्टाचे काम करायची तयारी असलेल्या पण स्वतःहून ते न मिळवू शकणाऱ्या सर्व अकुशल व्यक्तींना रोजगार मिळवून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. व्यक्तीला उपयुक्त ठरणारा व राज्याच्या अर्थव्यवस्थेला भरीव हातभार लावणारा उत्पादक रोजगार या योजनेखाली पुरविण्यात येतो. या योजनेखालील कामांची हमी अकुशल कामापुरतीच मर्यादित आहे. या योजनेखाली घेतलेल्या कामातून टिकाऊ सामुहिक मालमत्ता निर्माण व्हावी तसेच मजुरांना दिलेली मजुरी त्यांनी केलेल्या कामाप्रमाणे असावी हा या योजनेचा मूलभूत हेतू आहे.

थोडक्यात आणि सोप्या भाषेत असे म्हणता येईल की, "मागेल त्याला काम व कामाप्रमाणे दाम" या तत्त्वानुसार ग्रामीण भागातील काम करण्याची इच्छा व कुवत असेल अशा प्रत्येक व्यक्तीला या योजनेखाली अंगमेहनतीचे काम पुरविण्याची जिम्मेदारी शासनाने पत्करली आहे.

**योजनेचा फायदा कोणाला ?**

महाराष्ट्र राज्यातील ३० जिल्ह्यांपैकी बृहनमुंबई जिल्हा सोडून २९ जिल्ह्यातील २०३ तालुक्यांमधील ३९३५४ खेडेगावातून आणि १५५ क वर्ग नगरपालिका हद्दीत ही योजना लागू झाली आहे. १९९१ च्या खानेसुमारीप्रमाणे महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या ७ कोटी ८७ लक्ष आहे. त्यापैकी ग्रामीण भागातील ४ कोटी लक्ष लोकसंख्येला या योजनेचा फायदा होऊ शकतो. याचा अर्थ महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येपैकी ६१ टक्के लोकांना या ना त्या प्रकारे योजनेचा लाभ अपेक्षित आहे. या योजनेचा विशेष रीतीने फायदा घेऊ शकतील असे समाजघटक खालील असणार आहेत.

| | |
|---|---|
| १) १९८१ च्या जनगणनेप्रमाणे | |
| अ) अनुसूचित जाती | ३६.८६ लाख |
| ब) अनुसूचित जमाती | ५१.७० लाख |
| | ( ) |
| २) १९७६ च्या कृषी गणनेप्रमाणे | |
| अ) अल्पभूधारक | ३६.८६ लाख |
| ब) अत्यल्पभूधारक | १९.२५ लाख |
| | ( ) |
| ३) १९९१ च्या जनगणनेप्रमाणे शेतमजूर | ८३ लाख |
| ४) १९८१ गणनेनुसार | |
| दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण कुटूंबे (कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ३६००/- पेक्षा कमी असलेली) | ३४.३४ लाख |
| | ( ) |
| ५) ३१.१०.८४ रोजी रोजगारहमीयोजनेखाली नोंदलेले मजूर | ४३.२६ लाख |
| | ( ) |
| वरीलपैकी | |
| अ) अनुसूचित जाती | ८.२२ लाख |
| ब) अनुसूचित जमाती | ८.७९ लाख |

रोजगारहमीयोजनेची व्याप्ती आणि तिचा फायदा घेऊ शकतील अशा समाजातील सर्वात खालच्या थरातील तळागाळातील शोषित समाज कोणते आहेत व त्यांची संख्या किती आहे याची चांगली कल्पना यावरून येईल. यातील काही आकडे समिश्र आहेत. उदा. शेतमजूरांच्या ८३ लाखांच्या आकड्यात अनुसूचित जाती व जमाती तसेच अत्यल्प भूधारक, दारिद्र्यरेषेखालील कुटूंबे यांचा समावेश असणार.

**कामाची व्याप्ती**

या योजनेखाली घ्यावयाची कामे श्रमप्रधान आणि उत्पादक स्वरूपाची असली पाहिजेत. त्यातून दीर्घकाळ फलदायी ठरणाऱ्या भांडवलाची उभारणी झाली पाहिजे. श्रमप्रधान काम कोणते हे ठरविले आहे. एखाद्या कामावरील श्रमिकांच्या मजुरीची रक्कम आणि त्या कामासाठी लागणारी यंत्रसामुग्री, करावी लागणारी देखरेख आणि कुशल कामगारांच्या मजुरीवर झालेल्या खर्चाची या सर्वांची मिळून रक्कम यांचे प्रमाण ६०:४० असेल तर ते काम श्रमप्रदान मानायचे आहे. अर्थातच ज्या कामामध्ये मोठ्या प्रमाणावर कुशल कामगार किंवा सिमेंट, पोलाद, यंत्रसामुग्री वगैरेची आवश्यकता आहे ते काम या योजनेखाली मंजूर करता येणार नाही. मात्र अपवाद म्हणून टंचाईच्या काळातील अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी अशी कामे सुद्धा या योजनेखाली घेता येतील.

उत्पादक स्वरूपाची खालील प्रकारची कामे स्थुलमानाने या योजनेखाली घेता येतात.

**१) पाटबंधारे.**

अ) १) मोठ्या व मध्यम प्रकल्पांची श्रमप्रधान कामे.

२) लघूपाटबंधारे अंतर्गत तलावांचे बांधकाम, पाट काढणे,

३) पाझर तलाव

४) आदिवासी भागातील गावतळी,

५) मालगुजारी तलावांचे नुतनीकरणे

६) दुष्काळातील अपूर्ण असलेली गावतळ्याची कामे, नवीन गावतळी,

७) शासकीय उपसा सिंचनासाठी पाट काढणे,

८) कच्चे बंधारे.

**ब) पूर नियंत्रणाची कामे**

१) नैसर्गिक आपत्तीमुळे फुटलेले लघू पाटबंधारे, तलाव अथवा इतर तलाव दुरुस्ती.

२) पूर नियंत्रण कामाच्या अंतर्गत पूर प्रतिबंधक कामांची दुरुस्ती

**२) मृद संधारण व भूविकासाची कामे.**

अ) मृद संधारण - कंटूर बंडींग, नाला बंडींग, ग्रेडींग, नाला ट्रेनिंग, टेरेसींग व भू-सुधारणा आणि वृक्षारोपणाची कामे.

ब) निर्धारित विकास योजनेतील भातशेती आणि अन्य विभागातील कामे.

क) पाण वहाळ क्षेत्र विकास कार्यक्रम.

**३) वनीकरणाची कामे.**

वृक्षारोपण (वनीकरण) वनजमीन स्वच्छ करणे, बांबुची कामे (बांबू तोडणे) सामाजिक वनीकरणाची कामे, वन क्षेत्रातील रस्ते व अन्य कामे, कालव्याच्या आणि रस्त्यांच्या बाजूने झाडे लावणे, रोपवाटिका तयार करणे.

**४) रस्त्यांची कामे**

अ) डोंगराळ व दुर्गम भागातील रस्त्यांची कामे.

ब) अन्य भागातील रस्ते.

**५) "क" वर्ग नगरपालिका अंतर्गत कामे.**

१) "क" वर्ग नगरपालिका हद्दीतील गटार योजनेचा अकुशल भाग, पाणीपुरवठा योजना तसेच ग्रामीण भागात घेता येणारी अन्य कामे.

२) ग्रामीण भागात या योजनेखाली जी कामे घेण्यास परवानगी दिली आहेत ती सर्व कामे.

**६) ग्रामीण घरबांधणी कार्यक्रम**

कच्च्या विटा पाडणे, लाद्या (टाईल्स) तयार करणे, जांभा दगड फोडणे.

**७) अन्य कामे**

१) कमी उत्पन्न गटातील लोकांसाठी घरबांधणी

२) मत्स्यबीज संवर्धन योजनेतील तलावांचे निव्वळ मातीकाम

३) फलोद्यान

८) अल्पभूधारकांची आर्थिक उन्नती साधणारी म्हणजे जमीन व पाण्याचा परिपूर्ण वापर करण्यासाठीची उपयुक्त कामे.

९) महाराष्ट्र शेती महामंडळ व कृषी विद्यापीठाच्या जमिनीतील चाऱ्याची कामे.

१०) प्रयोगात्मक म्हणून राज्यातील १२ जिल्ह्यात घेतलेली जमिनीच्या सपाटीकरणाची कामे

११) प्रायोगिक प्रकल्प म्हणून घेतलेले रेशीम उद्योग अंबरचरखा कामे.

१२) कमांड परिसरातील मोठ्या व मध्यम प्रकल्पाखालील जमीन सुधारणेची कामे.

**घ्यावयाची दक्षता**

रोजगारहमीयोजनेखाली कामे सुरू करताना कोणकोणती दक्षता घेतली पाहिजे हे शासनाने ठरवून दिले आहे.

अ) रोजगारहमीयोजनेखाली कामे सुरू करताना शेतीच्या कामावर विपरीत परिणाम होता कामा नये, म्हणजे शेती कामाला मजूर मिळण्यास अडचण पडता कामा नये.

ब) पंचायत समितीच्या अथवा संलग्न पंचायत समितीच्या क्षेत्रात सुरू असलेल्या योजनेखालील किंवा योजनेतर कामावर लागणाऱ्या मजूरांचा विचार करून या योजनेखालील कामे सुरू करावीत.

क) सुरू असलेल्या अथवा अपूर्ण असलेल्या कामांची मजूरांची गरज पूर्ण झाल्यानंतरच रोजगार हमी योजनेखालील कामे सुरू करावीत.

वर नमूद केलेल्या अटी पूर्ण होत असतील आणि ५० किंवा अधिक श्रमिकांना कामावर घेण्याची गरज असली तरच रोजगार हमी योजनेखालील कामे काढता येतील. परंतु ५० पेक्षा कमी व्यक्तींनी कामाची मागणी केली तर त्यांना त्या क्षेत्रात अन्यत्र सुरू असलेल्या कामावर काम पुरवायचे आहे. डोंगराळ आणि आदिवासी भागात नवे काम सुरू करताना श्रमिकांची संख्या ५० नसेल पण काम चालू झाल्यावर आठवड्यात ५० लोक कामावर हजर होतील अशी जिल्हाधिकाऱ्यांना खात्री असेल तर नवे काम त्यांना सुरू करता येते. योजनेखाली अपूर्ण राहिलेल्या उत्पादक कामाला सर्वोच्च अग्रक्रम द्यायचा आहे.

**ठळक वैशिष्ट्ये**

रोजगगर हमी योजनेची सर्व माहिती विस्तार भयास्तव येथे देणे शक्य नाही. पण या योजनेच्या ठळक वैशिष्ट्यांचा थोडक्यात विचार केला आहे.

१) ग्रामीण भागात आणि "क" वर्गिय नगरपालिका परिषदेच्या क्षेत्रात राहणाऱ्या सर्व प्रौढ अकुशल व्यक्तिंना या योजनेखाली रोजगार पुरवावयाचा आहे. परंतु एखाद्या कुटूंबात एकही व्यक्ती मिळवती नसेल तर त्या कुटूंबातील १५ ते १८ वर्षापर्यंतच्या व्यक्तिस रोजगार देता येईल.

२) रोजगाराची हमी जिल्हास्तरावर दिली आहे. कामाची पसंती काम मागणाऱ्या व्यक्तिला करता येत नाही. जिल्ह्यात कोठेही कामाला जावे लागेल. साधारणतः पंचायत समिती क्षेत्रात काम द्यायची पद्धत आहे. रोजगार पाहिजे असलेल्याला रहात्या ठिकाणापासून ८ कि.मी. च्या त्रिज्येत कोठेही रोजगार उपलब्ध नसेल तर ८ कि.मी. च्या बाहेर जिल्ह्यात कोठेही रोजगार दिला जाईल. मात्र अशा ठिकाणी आवश्यक ती रहाण्याची व्यवस्था व प्रवास खर्चाची व्यवस्था केली जाते. कामावर जाताना व पुन्हा काम संपल्यावर किंवा बंद झाल्यावर घरी परतताना येणारा प्रवास खर्च दिला जातो अशी तरतूद आहे.

३) पाटबंधारे, सार्वजिनिक बांधकाम, कृषी वन यासारख्या शासकीय विभागांमार्फत व जिल्हा परिषदांमार्फत रोजगार हमी कामांची अंमलबजावणी केली जाते. त्यांना अंमलबजावणी अभिकरणे म्हणून संबोधण्यात येते.

४) रोजगार इच्छुकाने फॉर्म क्रमांक १ मध्ये आपले नाव गावातील नोंदणी अधिकारी (तलाठी/ग्रामसेवक) यांच्याकडे नियमांप्रमाणे नोंदवावयाचे आहे. त्यानंतर फॉर्म ४ भरून त्या

कामाची मागणी करावयाची आहे. फॉर्म क्रमांक-४ मधील अर्ज मिळाल्यावर म्हणजे कामाची मागणी केल्यापासून पंधरा दिवसात समिती अधिकाऱ्याने काम पुरवायचे आहे. रोजगार शोधणाऱ्याने समिती अधिकाऱ्यांनी दर्शविलेल्या कामावर सतत ३० दिवस तरी निदान काम करणार असल्याची घोषणा करायची आहे. फॉर्म क्रमांक ७ मध्ये समिती अधिकाऱ्यांनी काम शोधणाऱ्या व्यक्तिला अंमलबजाणी अधिकाऱ्याकडे पाठवायचे आहे. समिती अधिकाऱ्याच्या पत्रासह काम करणारी व्यक्ती सात दिवसात हजर झाल्यास अंमलबजावणी अधिकाऱ्याने त्या व्यक्तिला कामाला लावून घ्यायचे आहे. काम देता आले नाही तर दर दिवसाला रु. २/- प्रमाणे बेरोजगारभत्ता देण्याची जबाबदारी शासनाने उचलावयाची आहे.

५) फक्त उत्पादक कामानाच या योजनेखाली मुभा आहे. दुष्काळाची पुनरावृत्ती कमी करण्यासाठी ओलावा, संधारण व जलसंधारण कामांना प्राधान्य देण्याचा निर्णय झाला आहे. तेव्हा त्यानुसार कामांचा अग्रक्रम खालीलप्रमाणे निश्चित केला आहे.

अ) ओलावा व जलसंधारण - मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्पाचे श्रमप्रधान भाग, कालव्याची कामे, राज्य व स्थानिक क्षेत्र लघुपाटबंधारे, पाझर व साठवण तलाव व भूमिगत बंधारे.

ब) मृद संधारण व भूविकास कामे,

क) वनीकरण,

ड) १९८१ ते २००० पर्यंतची रस्ते योजनेत समाविष्ट असलेली रस्त्यांची कामे,

इ) पूर संरक्षक उपाययोजना.

६) कामाच्या एकूण खर्चाच्या ६० टक्के पेक्षा कमी अकुशल मजुरीचा भाग असलेली कामे रोजगार हमी योजनेखाली घेण्यास परवानगी नाही. मात्र मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्पांतर्गत खडक फोडण्याचा समावेश असलेली कालव्याची कामे याला अपवाद आहेत. अशा प्रकारच्या कामात किमान मजुरीचा भाग ५० टक्के तरी असला पाहिजे.

७) बहुशः हजेरीपटावरील मजूरांकडून विभागामार्फत (खाते) कामे केला जातात. मात्र कामगारांना त्यांच्या हजेरीनुसार मजुरी न देता त्यांनी केलेल्या कामाच्या प्रमाणात प्रत्येक कामाचे जे दर निश्चित केले आहेत त्यानुसार मजुरी दिली जाते. विविध कामांचे हे दर असे ठरविलेले आहेत की, सर्वसामान्य व्यक्तिने रोज सात तास व्यवस्थीत काम केल्यावर त्याला त्या भागातील शेतमजूरास कायद्यानुसार मिळणाऱ्या किमान वेतन मजुरीइतकी मजुरी मिळू शकेल. याला धरण बंधाऱ्याला मधोमध सिमेंट भिंतीचा आधार देणे या कामाचा अपवाद केला आहे. कारण हे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण व्हावे म्हणून प्रासंगिक (कंत्राटी) कामगारांकडून पूर्ण करून घेण्यात येते. त्यामुळे अर्धवट झालेली कामे पाण्याने वाहून जाण्याचा धोका टाळता येतो. त्याचप्रमाणे कालव्याच्या कामासंबंधात खडक स्फोटाचे काम याला अपवाद आहे. अशा कामावरच्या कामगारांना जास्त दराने मजुरी दिली जाऊ शकते.

**कामाचे नियोजन आणि मंजुरी**

जिल्ह्यासाठी १ ऑक्टोबर ते ३० सप्टेंबर या पुढील वर्षाच्या काळासाठी रोजगारहमी योजनेबाबत वार्षिक योजना जिल्हाधिकाऱ्यांनी तयार करायची आहे. चालू योजनांव्यतिरिक्त इतर कामे योजनाही तयार

ठेवण्यात येतात. त्यामुळे पुढील वर्षात नियोजित रोजगारापेक्षा (मनुष्य दिवसापेक्षा) सर्वसाधारण रोजगाराच्या १५० टक्के रोजगार देण्याची तयारी ठेवली जाते.

जिल्हाधिकारी रु.१० लाख पर्यंतची कामे मंजूर करू शकतात. आयुक्त रु.१५ लाख पर्यंतची कामे मंजूर करू शकतात. त्यापुढील कामे शासनाकडून मंजूर केली जातात.

**अंमलबजावणीची यंत्रणा**

रोजगार हमी कार्यक्रमावर परिणामकारक नियंत्रण रहावे, सतत संपर्क रहावा यासाठी त्रिस्तरीय प्रशासकीय यंत्रणा उभारली आहे. नियोजन दिग्दर्शन आणि समन्वयासाठी राज्य स्तरावर व अंमलबजावणीसाठी जिल्हा व पंचायत समिती स्तरावर समित्या नेमलेल्या आहेत.

राज्य स्तरावरील नियोजन विभागाकडे या कार्यक्रमाची सर्व सूत्रे दिलेली आहेत. नियोजन, प्रशासन, निधीची तरतूद, कार्यक्रमाचे नियंत्रण व मूल्यमापन या बाबी त्यांनी पहायच्या आहेत.

महसूल विभागाचे आयुक्त आपल्या विभागात रोजगार हमी योजनेचे नियंत्रण करतात तर जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांनी या कार्यक्रमाचे सर्व काम पहावयाचे आहे. पंचायत समिती स्तरावर कामाच्या मागणीचा अंदाज घेणे व विविध कामावर कामगारांची योजना करण्याचे काम तहसिलदारांकडे समिती अधिकारी म्हणून सोपविले आहे.

नियोजन विभाग अर्थ संकल्पीय तरतूद (म्हणजे खर्चाच्या रक्कमेचा) तरतूद करतो. जिल्हाधिकाऱ्यांना त्रैमासिक मर्यादा कळवतो. नंतर जिल्हाधिकारी स्वतःच्या अधिकारात अंमलबजावणी अधिकाऱ्यांना निधी पुरवितात. शासनाने नेमून दिलेल्या पद्धतीनुसार प्राथमिक आणि जिल्हा स्तरावर अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी (कार्यान्वयीन एजन्सी) हिशेब ठेवावयाचे आहेत.

रोजगार हमी योजनेचे साप्ताहिक मासिक अहवाल पाठवावे लागतात. कार्यान्वयीन एजन्सीने जिल्हाधिकाऱ्यांकडे, नियोजन विभागकडे सादर करायचे आहेत. चालू असलेली कामे त्यावरील मजूर क्षमता, कामगारांची उपस्थिती इत्यादी माहिती साप्ताहिक अहवालात द्यायची आहे. तर मंजूर कामे, पूर्ण झालेली कामे, चालू कामे, महिना अखेरची मनुष्य दिवस निर्मिती, महिनाभरात मजुरीसाठी झालेला एकूण खर्च इत्यादी बाबी मासिक अहवालात असतात.

**तपासणी व दक्षता**

तपासणी व दक्षता हे कार्य विभागीय स्तरावर आयुक्ताकडे सोपविले आहे. हे कार्य प्रत्येक विभागातील विशेष कार्य अधिकाऱ्यांमार्फत पार पाडायचे आहे. याशिवाय जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसिलदार आणि अंमलबजावणी अधिकरणाचे पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांनी रो.ह.यो. कामांची ठरवून दिलेल्या माप दंडाप्रमाणे देखरेख आणि तपासणी करायची आहे. कुप्रवृत्ती कमी व्हावी म्हणून विशेष अधिकार विभागीय आयुक्तांना दिले आहेत. सचिव (ग्रामीण रोजगार) यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चधिकार दक्षता समिती स्थापन करण्यात आली आहे. जिल्हा विभाग व राज्यस्तरावर दक्षता पथके स्थापन केली आहेत.

**साधन संपत्ती**

योजनेच्या अंमलबजावणीकरिता साधन संपत्ती उभारता यावी म्हणून राज्य शासनाने खालील विशेष कर लावले आहेत.

आजारीपण आणि अपंगत्व अलौन्स वगैरेची तरतूद असणाऱ्या केरळ ॲग्रीकल्चरल वर्कर्स ॲक्ट १९७४ च्या धर्तीचा केंद्रीय कायदा करण्यात यावा अशी सूचना खासदार चित्त बसू यांनी लोकसभेत बील क्रमांक ३२/१९९० मांडतांना केली होती. शेतमजुरांना नेहमीचे कमी मजुरीत राबविण्यात येते. त्यांची उपासमार होते. वर्षाच्या बऱ्याच मोठ्या कालावधीमध्ये ते बेकार असतात. कामाची सुरक्षीतता नसते. म्हातारपणाचे निवृत्ती वेतन नाही. आणि रडत खडत काम करतानाच ते मृत पावतात. म्हणून मी ग्रामीण मजूरांसाठी प्रतिदिन रु. ३५/- वेतन मिळाले अशी शिफारस करत आहे. कमिशन सदस्यांनी प्रतिदिन रु. २०-०० वेतनाची शिफारस केली आहे. भरमसाठ महागाई वाढत असतानाच्या या काळात या शिफारशीमध्ये मला काही तार्किक न्याय दिसत नाही. ते वाजवी तर नाहीच नाही पण जीवन वेतनही नाही.

बहुसंख्य भूधारकांकडून शेतमजूरांवर सामाजित आणि आर्थिक बहिष्कार टाकण्याची अती निर्लज्ज आणि अवमानास्पद प्रचलित प्रथा मोडून काढायची असेल तर माझ्या मते किमान वेतनाची म्हणजेच जीवन वेतनाची काटेकोरपणे अंमलबजावमी झाली पाहिजे.

शेतमजूरांच्या हितसंबंधाचा सर्व दृष्टीने विचार करून प्रतिदिन रु. ३५-०० किमान वेतन शेतमजूराला दिले गेले पाहिजे. या खाकदार चांदिराम यांच्या मताशी रोजगार हमी योजना समन्वय समिती निश्चितच सहमत आहे.

**मार्गदर्शक सूत्राप्रमाणे होणारे किमान वेतन**

१५ वी मजूर मंत्री परीषद आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये शेतमजूराचे किमान वेतन ठरविताना खालील मार्गदर्शक सूत्राचा अवलंब करावा अशी शिफारस आयोगाने केली आहे.

नवरा बायको व दोन मुले म्हणजे युनीट्स धरावेत. कुटूंबामध्ये एकजण कमावता मानावा. कुटूंबातील स्त्री व मुलांचे उत्पन्न लक्षात घेऊ नये.

१) अन्नाची गरज - इंडियन कोन्सील ऑफ मेडीकल रिसर्चने शिफारस केलेली अन्नाची गरज पुरुष ३९०० कॅलरीज स्त्री ३००० कॅलरीज मुलगा/मुलगी वय वर्षे १३ - २५०० कॅलरीज मुलगा/मुलगी वय वर्षे ७-१८००. कॅलरीज म्हणजे एका कुटूंबाची आवश्यकता ११,२०० कॅलरीज धरावी.

२) कपड्याची गरज - कपड्याची दरवर्षीची गरज दर व्यक्तीगणीक १८ यार्ड म्हणजे कुटूंबाची गरज ९२ यार्ड धरण्यात यावी.

३) निवारा - सरकारी गृह योजनेनुसार ठरविण्यात आलेले किमान जागेसाठिचे भाडे धरावे.

४) इंधन व वीज वगैरे साठीचा खर्च

वरील १ + २ + ३ च्या एकूण खर्चाच्या २० टक्के धरण्यात यावा.

५) सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार मुलांचे शिक्षण, वैद्यकिय सेवा, करमणूक, सण, उत्सव इत्यादी खर्चासाठी एकूण किमान वेतनाच्या २५ टक्के एवढी रक्कम धरायचे आहे.

वरील मार्गदर्शक सूत्रांप्रमाणे ऑगष्ट १९९२ बजारभाव लक्षात घेऊन शेतमजूरास किती किमानवेतन मिळायला पाहिजे हे आपण पाहूया.

**१) फोटो सहीत ओळखपत्र देणे**

मजुरांनी किती दिवस काम केले किती मजूरी मिळाली हे वेळोवेळी नोंदण्यासाठी एक पुस्तिका प्रत्येक मजुराला द्यावयाची आहे. दर आठवड्याला किती मजूरी दिली गेली याची नोंद या पुस्तिकेत करायची आहे. हजेरी पुस्तिका नी फोटोसहीत ओळखपत्र शासनाच्या खर्चाने मजूराला द्यायचे आहे. ही पुस्तिका पाच वर्षांकरिता चालेल. ही योजना १ मे १९८७ पासून अंमलात आली आहे.

**२) हत्यारांचे भाडे**

योजनेखालील कामे करण्यासाठी लहान हत्यारे उदा. फावडे, कुदळ इत्यादी शासनाने पुरवावयाची आहेत. जेव्हा मजूर स्वतःची हत्यारे आणून ती कामावर वापर करील तेव्हा त्याला या हत्याराचे प्रतिदिन भाडे द्यायचे आहे. प्रतिदिन २० पैसे भाडे व हत्याराना धार लावण्याकरिता प्रतिदिन ३० पैसे भाडे द्यायचे आहे.

**३) दरपत्रक लावणे**

रोजगार हमी योजनेत सुरू असलेल्या कामावर संबंधित कामाची मजूरी दर्शविणारा फलक त्या कामावर लावायचा आहे. या फलकावर मजुरीच्या सर्व बाबींचे दर दाखवायचे आहेत. दरपत्रका व्यतिरिक्त अशिक्षित मजूरांसाठी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी किती काम केले तर त्यासाठी किती मजूरी मिळू शकेल याचे प्रात्यक्षिक कामाचे ठिकाणी करून ठेवायचे आहे.

**४) मजुरी मजुरासच दिली पाहिजे**

काम केलेल्या प्रत्येक मजुराला (स्त्री अथवा पुरुष) त्यांनी केलेल्या कामाबद्दलची मजुरी संबंधीत मजुरासच दिली पाहिजे. म्हणजेच स्त्री मजूराची मजूरी तिच्या कुटूंबातील किंवा अन्य मजूराकडे न देता संबंधीत स्त्री मजूरालाच दिली पाहिजे.

**५) बाजाराच्या आदल्या दिवशी मजूरी द्यावी**

रोजगार हमी योजना कामावर काम करणाऱ्या मजूराना त्यांच्या दैनंदिन गरजेच्या वस्तु खरेदी करणे सोयीचे पडावे म्हणून त्या गावातील किंवा परिसरातील आठवडी बाजाराच्या आदल्या दिवशी मजूरी देण्यात यावी.

**६) खडी फोडणाऱ्या मजूरांना चष्मे**

रस्त्याच्या कामावर खडी फोडताना दगडी (दगडाचे बारीक तुकडे) उडून ते खडी फोडणाऱ्या मजूराच्या डोळ्यात जाण्याची शक्यता असते. त्यामुळे डोळ्यांना अपाय होण्याचा संभव असतो. तेव्हा ज्या वेळी खडी फोडण्याची कामे हाती घेण्यात येतील त्यावेळी मजूरांना तारेचे चष्मे पुरविण्याची व्यवस्था करावी.

**७) पिण्याचे पाणी**

श्रमिकांना पाणी पिण्यासाठी दूरवर जावे लागू नये त्यांचा वेळ जाऊ नये म्हणून कामाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी पुरविण्यात यावे. त्यासाठी रोजंदारीवर मजूर नेमण्याची तरतूद केली आहे. पाणी पुरविणाऱ्या मजुराला त्या त्या परिमंडळामध्ये निर्धारित केल्याप्रमाणे रोजंदारीवर मजुरी द्यावयाची आहे.

## ८) प्रथमोपचार

रोजगार हमी कामावर काम करीत असताना मजुरांना जखम व इजा वगैरे झाल्यास तातडीने उपचार करता यावा यासाठी कामाच्या ठिकाणी प्रथमोपचारांची व्यवस्था (फर्स्ट एड बॉक्स) ठेवण्यात येते.

## ९) मुलांना सांभाळण्याची व पाळण्याची सोय

रोजगार हमी योजनेच्या कामांच्या ठिकाणी स्त्री कामगारांनी आपल्याबरोबर आणलेल्या ३ वर्षे वयापर्यंतच्या किंवा त्या पेक्षा जास्त वयाच्या (५ वर्षापर्यंत) मुलांना सांभाळण्यासाठी रोजंदारीवर स्त्री कामगारांची नेमणूक करता येते त्यांना त्या परिमंडळामध्ये निर्धारित केल्याप्रमाणे रोजंदारीवर मजूरी द्यावयाची आहे. कामाच्या ठिकाणी उभारण्यात आलेल्या तात्पुरत्या शेडमध्ये स्वतंत्र विभागात कापडी पाळण्याची व्यवस्था करायची आहे. त्यासाठी लागणारे कापड खरेदी करणे व ते धुण्यासाठी व स्वच्छ ठेवण्यासाठी रोजगार हमीच्या रक्कमेतून खर्च करायचा आहे.

## १०) प्रसुती निमित्त सानुग्रह अनुदान

रोजगार हमी योजनेत काम करणाऱ्या स्त्री मजुरांनी प्रसुतीसाठी गैरहजर रहावयाच्या दिवसाअगोदर रोजगार हमी योजनेच्या कमीत कमी १५० दिवस काम केले असेल तर काही अटींवर तिला सानुग्रह अनुदान देण्याची तजवीज शासनानी केलेली आहे हे अनुदान ३० दिवसांच्या कालावधीसाठी देण्यात येते. संबंधीत परिमंडळातील निर्धारित केलेल्या किमान दराप्रमाणे प्रतिदिन दर समजून हे अनुदान द्यावयाचे आहे. असे अनुदान देताना संबंधीत स्त्री मजुरांच्या मुलांच्या संख्येचा विचार केला जात नाही.

## ११) कुटूंब नियोजन शस्त्रक्रियेकरिता सानुग्रह अनुदान

रोजगार हमी योजनेवरील स्त्री-पुरुष मजुरांनी कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेतल्यास स्त्री मजुराला १४ दिवस व पुरुष मजुराला ७ दिवस गैरहजर रहाण्याची परवानगी देण्यात येते. गैरहजर दिवसांची संबंधीत परिमंडळात निर्धारित करण्यात आलेल्या दराप्रमाणे प्रतिदिन दर समजून सानुग्रह अनुदान काही अटींच्या आधिन राहून देण्यात येते. प्रसूती आणि कुटूंब नियोजनाचे बाबतीतील सानुग्रहाचे वाटप तहसिलदारांनी करायचे आहे.

## १२) मजुराचा अपघाती मृत्यू सानुग्रह अनुदान

रोजगार हमी योजनेच्या कामावर अपघात झाला आणि कोणी मजूर जखमी झाल तर अशा मजूराला-जवळच्या प्राथमिक केंद्रात नेऊन तेथे प्रभारी अधिकाऱ्यांनी दाखल करायचे आहे. रुग्णालयात जखमी मजूर असेपर्यंत त्याचा औषधोपचाराचा व राहण्याचा खर्च शासनातर्फे करण्यात येतो.

अपघातात कामावर असलेला मजूर मृत झाल्यास त्या मजुराच्या वारसाला रु. ५०००/- एवढे सानुग्रह अनुदान देण्यात येते.

## १३) मजूराच्या मुलाचा अपघाती मृत्यू सानुग्रह अनुदान

रोजगार हमी योजनेवर काम करणाऱ्या मजूराने स्वतःचे सोबत आणलेला मुलगा अपघातात जखमी झाला तर त्याचा औषधपाण्याचा आणि रुग्णालयात राहण्याचा खर्च शासनाने करायचा आहे. तसेच मजुराचा मुलगा अपघातात मृत्यु पावला तर त्या मुलाच्या पालकाला सानुग्रह अनुदान देण्यात येईल. परंतु या

बाबतीत झालेला मुलाचा अपघाती मृत्यु आणि रोजगार हमी योजना कामाचा अन्योन्य संबंध प्रस्थिपित झाला पाहिजे.

### मजुरीचे दर

रोजगार हमी योजनेत काम करणाऱ्या मजुरांनी प्रति दिवशी सात तास काम केले म्हणजे संबंधीत परिमंडळातील शेतमजुराच्या किमान वेतनाइतके वेतन त्यांना मिळू शकते. १ ऑगस्ट १९८८ च्या शासन निर्णयाप्रमाणे शेतमजूराचे किमान वेतन परिमंडळ ४ करिता प्रतिदिन १२ रुपये, परिमंडळ ३ करिता प्रतिदिन १४ रुपये परिमंडळ, २ करिता प्रतिदिन १६ रुपये व पिरमंडळ १ करिता प्रतिदिन २० रुपये करण्यात आले आहे. शेतमजूरांकरिता नर्धारित केलेल किमान वेतन व रोजगार हमी योजनेतील वेतन यामध्ये सध्या चालू असलेली सांगड चालू ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तेव्हा १९८५ च्या या निर्णयानुसार निश्चित करण्यात आलेल्या रोजगार हमी दर पत्रकामध्ये दुप्पटीने वाढ दिनांक १ मे १९८८ पासून शासनाने केली आहे.

### लोकांचा सहभाग व नियंत्रण

राज्य विधीमंडळाने एका विशेष विधीमंडळ समितीची स्थापना यासाठी केली आहे. या समितीची कार्य खालील प्रमाणे आहेत.

रोजगार हमी योजनेची खालील संदर्भात तपासणी व मुल्यमापण करणे,

अ) योजनेमुळे रोजगार प्राप्त झालेल्या लोकांना झालेले फायदे व त्यांच्यावर पडलेला प्रभाव.

ब) योजनेतील दोष व त्रूटी असल्यास त्या शोधून काढणे, व सुधारण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

जिल्हा आणि पंचायत समिती स्तरावर अनुक्रमे जिल्हा व पंचायत रोजगार हमी समिती नियुक्त केलेली आहे. मागासवर्गीय कामगार व कृषि कामगारांच्या नोंदणीकृत संघटनांचे प्रतिनिधींची नेमणूक या समितीवर करायची आहे. तसेच या समित्यांवर महिलांनाही पुरेसे प्रतिनिधीत्व द्यायेचे आहे.

रोजगार हमी परिषद म्हणून एक समिती योजनेचे वेळोवेळी मुल्यमापम करण्यासाठी स्थापन करण्यात आलेली आहे. आवश्यक वाटल्यास योजनेत सुधारणा करण्यासंबंधात शासनाला या परिषदेने सल्ला द्यायचा आहे. परिषदेचे अध्यक्ष आणि सदस्यांची नेमणूक शासनाकडून केली जाते.

### योजनेच्या स्वरूपातील फेररचना

### अ) जवाहर विहिरी

१ सप्टेंबर १९८८ पासून केंद्र शासनाने पुरस्कृत केलेल्या जीवनधारा योजनेप्रमाणे जवाहर विहिरींचा कार्यक्रम रोजगार हमी योजनेखाली घेतला आहे. दारिद्रय रेषेखाली असेलेल्या लहान व सिमांकित शेतकऱ्यांच्या जमिनीवर हा कार्यक्रम राबवायचा आहे. दिनांक २४-१२-९१ पासून या योजनेत वाढ केलेली आहे. आणि आता नाबार्डच्या व्याख्येनुसार लहान शेतकऱ्यांच्या जमीनीवर हा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर घ्यायचे ठरले आहे. यामध्ये एकूण लाभार्थींपैकी ६० टक्के लाभार्थी ५ एकर जमीन असलेले असणार आहेत. या ६० टक्के लाभार्थी मध्ये ५० टक्के लाभार्थी हे अनुसूचित जाती, अनूसूचित जमाती,

विमुक्त व नवबौद्ध असतील. याचा अर्थ ५ एकरांपेक्षा जास्त जमीन असलेले लाभार्थी ४० टक्के असतील. पुढील ५ वर्षात १ लक्ष विहीरी बांधून देण्याचे भव्य उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.

**श्रमशक्तीतून ग्रामविकास**

२२ जून १९८९ च्या शासकीय निर्णयाने "श्रमशक्तीतून ग्रामविकास" हा कार्यक्रम अंमलात आला आहे.

रोजगार हमी योजनेच्या अंतर्गत गावाच्या विकासाची सर्व प्रकारची कामे घेऊन गावाचा विकास साधणे असे या योजनेचे सर्वसाधारण स्वरूप आहे. गावच्या शिवरात वर्षभरात पडणारे पाणी अडविणे व जिरवणे, गावांतील जमीनीचे योग्य असे नियोजन करून कमाल शेती उत्पादन वाढविणे, अंबरचरखा, वगैरेसारखे मजूर प्रधान छोटे उद्योग वाढविणे हा गावच्या विकासाचा मुलभूत पाया आहे. असे समजून ही योजना राबवायची आहे. या कामांची सांगड या योजनेखाली घालायची आहे. उदाहरणार्थ, पाझर तलावाच्या कामाची सांगड विहीरी बांधून, पाईप वगैरे टाकून साठलेल्या पाण्याचा लाभार्थीला लवकर उपयोग करून देता येईल. गाव विकासासाठी एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम तसेच जवाहर रोजगार योजनेसारख्या योजनांची या कार्यक्रमांशी सांगड घालायची आहे. या कार्यक्रमासाठी एकदा का गाव निवडले की, या कार्यक्रमात समाविष्ट असलेली कामे पूर्ण होईपर्यंत हा कार्यक्रम गावात चालू रहाणार आहे. या कार्यक्रमामुळे गावाचा विकास व्हावा. रोजगार निर्माण व्हावा, गावच्या लोकांना गावातच काम मिळावे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. मृद संधारण, व जल संधारण, वनीकरण, सामाजिक वनीकरण, मत्स्यबीज संवर्धन, तळी, फलोत्पादन इत्यादी ग्रामविकासाटी कामे या योजनेखाली घ्यायची आहेत. नाबार्डच्या, व्याख्येप्रमाणे अल्प/ अत्यल्प भूधारक यांच्या जमिनीवर संपूर्ण शासकीय खर्चाने व्यक्तीगत लाभ देणारी कामे जसे विहीरी, फलोत्पादन वगैरे घेतली जातील, इतरांच्या बाबतीत लाभधारकांना ५० टक्के कामाचा खर्च सोसावा लागणार आहे.

गावी हा कार्यक्रम रोजगार हमी योजनेचा एक भाग म्हणून राबवायचा असल्याने दर दिवशी कमीत कमी ५० मजूर उपलब्ध करून देण्याची जबाबदारी गावानी पार पाडायची आहे. भूमिहीन मजूर नसलेल्या कुटूंबातील दोन सदृढ व्यक्तींनी दोन महिन्यातून किमान एक दिवस श्रमदान करायचे आहे. असे श्रमदान केले नाही तर त्याऐवजी एक दिवसाच्या मजुरीची रक्कम द्यायची आहे. चाराबंदी, कुऱ्हाडबंदी अशासारख्या अटी त्या गावच्या ग्रामसभेने २/३ बहुमताने मान्य करायच्या आहेत. परंतु ज्या गावातील पृष्टभागातील प्रवाही सिंचनक्षेत्र (उपसिंचनाच्या सोयीसह २० टक्क्यांपेक्षा अधिक आहे,) अशा गावात हा कार्यक्रम घेता येणार नाही. या योजनेखाली निवडलेल्या गावाच्या ५ कि. मीटरच्या परिसरातील गावे सोडून इतरत्र रोजगारहमी योजनेची कामे चालू रहाणार आहेत.

**फळझाडे लागवड**

२१ जून १९९० पासून रो. ह. योजनेशी निगडीत फळझाडे लागवड उपाययोजना शासनानी चालू केली आहे. त्या वर्षी व पुढील वर्षी १.२० लाख हेक्टरवर सदर कार्यक्रम राबवायचे शासनानी ठरविले आहे. तर आठव्या पंचवार्षिक योजनेत १० लाख हेक्टरवर हा कार्यक्रम राबविण्याचे शासनाचे उद्दीष्ट आहे.

जात-पात किंवा लहान मोठा शेतकरी न पहाता त्यांचे जमीनीवर हा कार्यक्रम राबविता येतो. कमीत कमी ०-२ हेक्टर (म्हणजे २० आरे) आणि जास्तीत जास्त ४ हेक्टर जमीन असणाऱ्या लाभधारकांच्या जमीनीवर फळझाडे लागवड करता येतात. पण कोकण व पश्चिम घाट क्षेत्रात किमान मर्यादा ०-१ हेक्टर (म्हणजे १० आरे) ठरविलेली आहे. नाबार्डच्या व्याख्येप्रमाणे असलेले लहान शेतकरी व अनुसूचित जाती/ जमाती/ भटक्या जमाती यांच्या जमीनीवर शासनाकडून १०० टक्के सरकारी खर्चात हा कार्यक्रम

घेतला जाईल. इतरांचे बाबतीत मोठे शेतकरी त्यांचे जमीनीवर १०० टक्के अकुशल खर्च शासन सोसणार आहे. कुशल भागावरील खर्चापैकी ७५ टक्के खर्च शासनाने व २५ टक्के खर्च लाभधारकाने करायचा आहे. हा कार्यक्रम सहकारी संस्था आणि ट्रस्टच्या जमिनीवर सुद्धा घेता येतो.

**स्थलांतर थांबलेले नाही**

ग्रामीण श्रमिकांना रोजगार मिळावा, तो त्यांना गावचे आसपास मिळावा, त्यांचे स्थलांतर होऊ नये याही हेतून रोजगार हमी योजना सुरू झाली. महाराष्ट्र हा दऱ्या खोऱ्यांचा आणि डोंगराळ प्रदेश आहे. कोरडवाहू जमीन प्रामुख्याने आहे. राज्यातील ७३ तालुके अवर्षणग्रस्त आहेत. महाराष्ट्रात दरवर्षी कोठे ना कोठे दुष्काळ सादृश परिस्थिती असते. वाहतुकीची सुविधा असल्याने काही भागात धान्य नसले तरी तेथे धान्य पुरवठा होतो. भूकबळी पडत नाहीत हे खरे आहे. पण ग्रामीण श्रमिकांमध्ये धान्य विकत घेण्याची क्षमता नसते. त्यांची उपासमार होते. रोग प्रतिकारक शक्ती रहात नाही. त्यांची मुले रोगांना बळी पडतात. त्यांना रोजगार हमी कामाची नितांत गरज असते. काम जर वेळेवर मिळाले नाही तर निव्वळ जगण्यासाठी त्यांना स्थलांतर करावे लागते. ऊस तोडणी, कापूस वेचणी, पेरणी, कापणी, लावणी, इत्यादी शेती कामे, वीटभट्टी, कोळसाभट्टी, बांधकाम आणि अन्य कामांवर हे स्थलांतरीत मजूर काम करताना आढळतात.

स्थलांतरीत मजूर गरजू असल्यने कमी मजूरीतही काम करतात. ते स्वतःचे गाव सोडून लांब परगावी आलेले असतात ते निराधार असतात. सर्व तऱ्हेच्या पिळवणूकीला, अन्यायाला, अत्याचारांना ते बळी पडतात. ते प्रतिकार करुच शकत नाहीत. थोडक्यात लाखो स्थलांतरीत मजुरांच्या अपार कष्टांवर त्याच्या होणाऱ्या अफाट पिळवणूकीवर हिरव्या क्रांतीचा विकासाचा, वैभवाचा आणि भरभराटीचा आजचा डोलारा उभा आहे.

ज्या भागातून मोठ्या संख्येनी मजूर स्थलांतरित होतात त्या भागात रोजगार हमी योजनेची कामे सुरू झाली. ही कामे पीक हंगाम सोडून वर्षभर सुरू राहीली तर स्थलांतराचे प्रमाण खूप कमी होईल. परंतु स्थलांतर चालू राहण्यामध्ये विकसित आणि बागाईत भागातील नवश्रीमंत भूधारकांचे, वीटभट्टी मालकांचे, बिल्डर्सचे, मजूर कंत्राटदारांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. अर्थातच रोजगार हमी योजनेची कामे सुरू करण्याला त्यांचा नेहमीच विरोध असतो. मजुरांच्या सततच्या मागणीमुळे, चळवळीमुळे रो. ह. योजनेची कामे सुरू करावी लागली तर ती बंद करण्यासाठीच्या खटपटीत ते असतात. त्यासाठी सर्व प्रकारचे मार्ग ते अनुसरतात. त्यांच्या या प्रयत्नात नोकरशाही साथ देते. सर्वत्र हे अनुभवाला येत आहे.

**विश्व बँकेला रो. ह. यो. पसंत नाही**

भारताच्या अर्थव्यवस्थेवर आता विश्व बँकेकडून दडपण आणले जात आहे. विश्व बकनी अशी शिफारस केली आहे की, " महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेवर होणारा खर्च कमी केला पाहिजे. ही शिफास अंमलात आणण्यासाठी, तीन मार्ग विश्व बँकेनी सुचविले आहेत.

१) मजुरीचे दर कमी करणे.

२) या योजनेखालील प्रदेश कमी करणे, आणि

३) ही योजना गुंडाळून ठेवण्याची, संपूर्ण बंद करण्याची तरतूद करणे.

विश्व बँकेच्या मताने रोजगार हमी योजना किमान वेतन कायद्यातून वगळली तरच सरकारी बोजा टाळता येईल. मोठ्या प्रमाणावर चालणाऱ्या अशा योजनेशी किमान वेतन कायदा विसंगत आहे. असे प्रतिपादन करून विश्व बँकेनी असेही सुचविले आहे की, योजनेवरील खर्च कमी व्हावा तसेच योजनेचा उपयोग फक्त

अती दरिद्री लोकांना कसे तरी जीवंत ठेवण्यासाठीच व्हावा म्हणून सर्व उपाय योजले पहिजेत. या योजनेवर मिळणाऱ्या मजुरीचे दर सर्वसाधारण दरापेक्षा कमी ठेवले पाहिजेत. असा विश्व बँकेचा आग्रह आहे. महाराष्ट्रात रोजगार हमी योजनेखालील कामे कमी होत आहेत याचे हेही एक कारण असू शकेल.

## शिफारशींचा अंमल सुरू

रोजगार हमी योजना अंतर्गत खर्चाच्या वितरणाचा रोख पाहिला तर असे दिसते की, विश्व बँकेच्या शिफारशींचा अंमल यापूर्वीच चालू झाला आहे. मजूरांच्या वेतनखर्चासाठीची टक्केवारी दिवसानूदिवस घसरत आहे. त्याचे काही बोलके आकडे खाली दिले आहेत.

| वर्ष | वेतन खर्चाची टक्केवारी |
|---|---|
| १९७५-७६ | ९०-९५ |
| १९८०-८१ | ७५-९० |
| १९८५-८६ | ६६-८५ |
| १९९०-९१ | ६०-०० |
| १९९१-९२ | ५८-३४ |

काही इतर खात्याचे खर्च उदाहरणार्थ, सिंचन आणि वन खात्याची कामे रोजगार हमी योजनेखाली करून घेऊन त्यावरील खर्च रो. ह. योजनेच्या खाती शासन दाखवू लागले आहे असाही यांचा अर्थ होतो.

## १९९२ च्या दुष्काळाचा अनुभव

१९७२ मध्ये पडलेल्या भीषण दुष्काळाचा अनुभव घेतल्यावर दुष्काळ पडू नये आणि पडलाच तर त्याला यशस्वीपणे तोंड देता यावे म्हणून रोजगार हमी योजना उपयोगी पडावी हा ही एक हेतू आहे. १९९२ मध्ये महाराष्ट्रातील मोठ्या विभागातून पाऊस वेळेवर व पुरेसा पडला नाही. दुष्काळसादृश परिस्थिती निर्माण झाली. राज्यातील एकूण खेड्यापैकी ७८ टक्के खेडी टंचाईग्रस्त असल्याचे शासनाने जाहिर केले पाण्याची पातळी खोल गेल्याने ४०० फूट खोलीवरही पाणी लागणे मुष्कील झाले. पिण्याच्या पाण्यासाठी ५/५, ६/६ कि. मीटर चालत जाण्याचा प्रसंग महिलांवर आला. चारा नाही म्हणून कत्तलखान्याकडे हजारोंच्या संख्येनी गुरे जाऊ लागली. १९९२ मध्ये २९,१७५ खेडी टंचाईग्रस्त जाहिर केली होती. या खेड्यातील अंदाजीत लोकसंख्या ३-५ कोटी आहे. तर रो. ह. योजने खालील रोजगार क्षमता फक्त १० कोटी मनुष्य दिवसाची होती. याचा अर्थ दुष्काळ ग्रस्त भागातील प्रत्येक गरजू व्यक्तीस सरासरी ७ दिवसांचा रोजगार मिळू शकला असता. २५ जानेवारी १९९२ ला सरकारी आकड्यांप्रमाणे रो. ह. योजना कामावर ४-१० लाख मजूर काम करत होते. एकूण १३.२४ लाख कामगारांना काम देण्याची क्षमता आसलेली कामे तयार ठेवली आहेत. असा शासनाचा दावा होता. थोडक्यात दुष्काळी वर्षासाठी रोजगार हमी योजना अंतर्गत निर्माण होणारा एकूण रोजगार गरजेच्या तुलनेत अत्यंत तुटपुंजा होता. तो वाढविण्यासाठी शासनाने कुठलेही भरीव प्रयत्न केले नाहीत. दुष्काळी भागात लोकांच्या हाल अपेष्टा, उपासमार होत होती. शासन थंड राहिले.

विधानसभा व विधान परिषदेत दुष्काळाकडे लक्ष वेधण्यासाठी विरोधी पक्षांनी अभूतपूर्व गोंधळ घातला. देशाचे लक्ष वेधण्यसाठी ८ मे १९९२ ला महाराष्ट्रात विरोधी पक्षांनी बंद पाळला, महाराष्ट्र शासन स्वस्थ

राहिले. केंद्र सरकारकडे दुष्काळ निवारणासाठी शेवटपर्यंत भीक मागत राहिले. ही मदत शेवटपर्यंत मिळाली नाही, आणि शासन निष्क्रीय राहीले.

**पण पैसा कमी होता का ?**

प्रश्न असा निर्माण होतो की, दुष्काळाला तोंड देण्याकरिता, रो. ह. योजना कामे मोठ्या प्रमाणात काढण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे पैसा नव्हता का ? नुसत्या रोजगार हमी योजनेच्या रक्कमेचाच फक्त आपण येथे विचार करु या ! रोजगार हमी योजनेत तीन मार्गानी आवक होते.

१) व्यवसाय कर,

२) महाराष्ट्र कर अधिनियम (सुधारणा) १९९१ नुसार गोळा होणाऱ्या महसूलाच्या १ टक्का रक्कम आणि,

३) वरील दोन प्रकारे जमा झालेल्या एकूण रक्कमेइतकाच वाटा महाराष्ट्र शासनाकडून येतो.

यातील व्यवसाय कर श्रीमंताऐवजी कामगारांकडून वसूल केला जाणारा विषम कर आहे. या करापासून मिळणारे उत्पन्न दरवर्षी वाढतच आहे.

उदाहरणार्थ-

| | | | |
|---|---|---|---|
| १९९०-९१ | प्रत्यक्ष | १७५.४९ | कोटी रुपये |
| १९९१-९२ | अंदाजित | २०८.६५ | कोटी रुपये |
| १९९२-९३ | अंदाजित | २१५.१६ | कोटी रुपये |

सध्या रोजगार हमी योजनेत प्रचंड शिल्लक आहे. १९९१-९२ मध्ये निधीत ८१० कोटी रुपयांची शिल्लक होती. १९९२-९३ च्या अंदाजपत्रकातील ३०८.६ कोटी रुपयांच्या तुलनेत निधीतील आवक ६२०-१ कोटी रुपये असणार आहे. तेव्हा निधीतील शिल्लक रक्कम ११२१.६ कोटी रुपयांवर जाणार आहे. ही प्रचंड रक्कम रिझर्व बँकेत ठेवलेली आहे. रिझर्व बँकेतून महाराष्ट्र सरकार जी जादा रक्कम उचल म्हणून घेते त्यांची हमी म्हणून या रक्कमेचा सध्या वापर होत आहे. केंद्र सरकार दुष्काळ निवारणासाठी मागणी करूनही महाराष्ट्र राज्याला सहाय्य का. करत नाही याचा खुलासा एकप्रकारे यामुळे होतो. रोजगार हमी योजनेसाठी कर रूपाने मिळणारे उत्पन्न भरीव आहे. तेव्हा रोजगार हमी योजना चालू ठेवण्यात आता महाराष्ट्राच्या सत्ताधाऱ्यांचे आर्थिक हितसंबंध गुंतलेले आहेत. या वास्ताची जाणीव आपल्याला ठेवावी लागेल. कोणत्याही परिस्थितीत ही योजना बंद न करीता आवश्यक ते दुसरे वळण देऊन रोजगार हमी योजनेचे हे नाटक चालू ठेवणें महाराष्ट्र सरकारला अत्यावश्यक झाले आहे.

**कामे मोठ्या प्रमाणावर काढण्यासाठी संघर्ष**

रो. ह. योजना ग्रामीण श्रमिकांसाठी आहे. समाजातील तळागाळातील पिडीतांना रोजगार देऊन त्यांचे जीवन सुसह्य करण्याकरिता ती आहे विविध करांपासून जितके उत्पन्न या योजनेसाठी जमा होते तितकीच रक्कम शासनाला द्यावी लागते. त्यामुळे भरीव म्हणजे ६०० ते ७०० कोटी रुपये शासनाला या योजनेकरिता दरवर्षी उपलब्ध होतात. कमीत कमी खर्च करून प्रचंड रक्कम रिझर्व बँकेत ठेऊन त्याचे आधारे उचल घेऊन तुटीची अर्थव्यवस्था चालविण्याचे शासनाचे सध्याचे धोरण पुढे चालू राहणार आहे. ते बदलण्यासाठी ग्रामीण श्रमिकांना फार मोठ्या प्रमणावर संघर्ष करावा लागेल.

ग्रामीण मजुरांचे स्थलांतर होण्यात त्यांना किमान वेतनही न देण्यात, किमान वेतन न वाढविण्यात सधन शेतकऱ्यांचे आणि सरकारचे हितसंबंध गुंतलेले आहेत. सधन मराठा शेतकऱ्यांचे महाराष्ट्रावर राज्य आहे. रोजगार हमी योजना मोठ्या प्रमाणावर राबवली जाणार नाही असे प्रयत्न गेले काही वर्षे जाणिवपूर्वक या सर्वांकडू होत आहेत. तेव्हा ग्रामीण श्रमिकांच्या हितरक्षणासाठी रोजगार हमी योजनेची कामे गावोगावी काढावीत ती पिकाचा हंगाम सोडून वर्षभर चालू ठेवावीत. म्हणून ठिकठिकाणी जे संघर्ष चालू आहेत. ते, यापुढेही अधिक तीव्रतेने आणि प्रचंड प्रमाणावर कामाची गरज असणाऱ्यांनी व त्यांच्या संघटनांनी एकमेकांशी समन्वय साधून संघर्ष चालू ठेवावा लागेल.

**सधन भू-धारकांकरिता रो. ह. योजना**

महाराष्ट्र राज्य शानाने रोजगार हमी योजनेची फेररचना सुरू केली आहे. या फेररचनेचा काळजीपूर्वक विचार केला तर रोजगार हमी योजनेमधून घेतलेल्या उत्पादक कामातून गावातील सामुहिक संसाधनांचा विकास करण्याच्या धोरणाला मुरड घालण्याचा, त्याला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसून येते.

जवाहर विहीर योजना सुरुवातिला फक्त अनुसूचित जाती व जमातीच्या व्यक्तीपुरतीच मर्यादित होती. पण ५ सप्टेंबर १९८९ च्या निर्णयाने इतर लहान व सिमांतिक शेतकऱ्यांना ती लागू करण्यात आली आह. तर दिनांक २४-११-९१ पासून या योजनेत वाढ करून विहीरी खोदण्याचा कार्यक्रम नाबार्डच्या व्याख्येनुसार लहान शेतकऱ्यांच्या जमिनीवर मोठ्या प्रमाणात घेण्याचे शासनाने ठरविले आहे. आता देशावरील कोरडवाहू आणि बागायत क्षेत्रातील मध्यम शेतकरीही (ज्यात नवधनीकही असतील) या योजनेचा लाभ घेऊ शकतील. थोडक्यात रो. ह. योजनांचा लाभ घेऊ शकतील. थोडक्यात रो. ह. योजना मध्यम शेतकऱ्यांच्या आर्थिक लाभांसाठी वापरली जाणार असा होतो.

२१ जून १९८९ पासून रोजगार हमी योजनेशी निगडीत फळझाडे लागवड उपयोजना चालू केली आहे. या उपयोजनेत जास्तीत जास्त ४ हेक्टर जमीनीत फळझाडांची लागवड करता येणार आहे. ज्या भू-धारकांनी आपल्या लागवडीलायक जमीनी वर्षानुवर्षे ओस ठेवल्या जमीनी पडीत ठेवून विकासास अडथळा आणला. कुळ कायद्याचा भंग केला तसेच ज्या भूधारकांच्या जमीनीत कुळे आहेत पण त्यांचा हक्क मान्य केलेला नाही. कुळांची नोंद झालेली नाही. अशा जमीनीतूनही ही फळझाडांची उपयोजना अंमलात येणार आहे. यांतही नाबार्डच्या व्याख्येनुसार अल्पभूधारक असणाऱ्यांचे बाबतीत १०० टक्के खर्च शासन करणार आहे. तर अन्य म्हणजे मोठ्या सधन भू-धारकांना या योजनेप्रमाणे अकुशल भागाचा १०० टक्के कुशल भागाचा ७५ टक्के खर्च शासन करणार आहे. आणि कुशल भागाचा फक्त २५ टक्के खर्च त्यांच्याकडून वसूल केला जाणार आहे. श्रीमंत शेतकऱ्यांच्या प्रत्येकी ४ हेक्टर म्हणजे १० एकर जमीनीवर रो. ह. योजनेच्या खर्चाने मोठमोठ्या फळबागा फुलवल्या जाणार आहेत असा याचा अर्थ होतो. रोजगार हमी योजनेच्या मुळच्या धोरणाप्रमाणे गावांची सामुहिक संसाधने नाही तर सधन भूधारकांच्या खाजगी जमीनी सरकारी खर्चाने आणि ग्रामीण श्रमिकांच्या कष्टाने विकसित होणार आहेत. ही फेररचना रो. ह. योजनेच्या मुळे उद्दीष्टांच्या विरोधी आहे. या विरुद्ध मोठ्या प्रमाणावर रान उठविण्याची, चळवळ करण्याची आवश्यकता आहे. हे ही लक्षात घ्यावे लागेल की या फेररचनेस आताच विरोध झाला नाही तर महाराष्ट्र राज्य सरकार नव्या नव्या उपयोजना मंजूर करत मोठ्या सधन भधारकांची साधन संपत्ती विकसीत करण्यासाठी रो. ह. योजनेचा बिनदिक्कत वापर करणार आहे.

**कमी वेतन देऊन होणारी फसवणूक**

रोजगार हमी योजनेवरील बहुसंख्य कामे ही बांधकाम व्यवसायातील व बांधकाम मजुरांसाठी ठरविलेल्या किमान वेतनात समाविष्ट होणारी असतात. पण शासन मात्र आपली नित्याच्या नियोजनातील कामे रोजगार हमी योजनेवर कमी वेतनात करून घेत आहे. बांधकाम कामगारांचे आणि वन कामगारांचे वेतन महागाई

निर्देशांकाशी जोडलेले आहे. या दोन्ही व्यवसायातील महागाई भत्ता १९८८ ते १९९२ पर्यंत अनुक्रमे २७५ टक्के व ४७५ टक्के वाढविलेला आहे. मात्र रोजगार हमी वरील मजुरांना शेतमजूरांसाठी १९८८ मध्ये ठरविण्यात आलेल्या किमान वेतनात राबवून घेतले जात आहे. हाच अनुभव जवाहर रोजगार योजनेअंतर्गत चालणाऱ्या कामांबाबतही येत आहे. केंद्र शासनाचे या योजनेसाठी एक मॅन्युअल आहे. त्यातील पृष्ठ क्रमांक ३० वर असे स्पष्ट नमूद केले आहे की, ज्या व्यवसायातील कामे मंजूर करण्यात येतील त्यांना त्या व्यवसायातील प्रचलित किमान वेतन दिले गेले पाहिजे. परंतु तरीही जवाहर रोजगार योजनेची कामेही रोजगार हमी योजनेच्या वेतनात सर्वत्र करवून घेतली जात आहेत. केंद्र सरकाने केलेल्या नियमांचे उघड उघड उल्लंघन आहे. हे संतापजनक आहे. रो. ह. योजनेच्या कामगारांची आणि जवाहर रोजगार योजना कामगरांचीही फार मोठ्या प्रमाणावर फसवणूक आणि पिवळणूक शासनाकडून होत आहे, हे थांबले पाहिजे.

**पुरुषांसाठी सात तास तर महिलांसाठी सहा तास असावेत**

प्रचलित किमान वेतन कायद्याप्रमाणे कायमाचे तास सात ठरविण्यात आले आहेत. परंतु मध्यंतरी विखे पाटील कमिटीच्या शिफारशीनुसार कामाचे तास वाढवून ते ९ तास करायचे शासनाने ठरविले आहे. ८ तास काम, ८ तास झोप, ८ तास विश्रांती या हक्कासाठी जगभरातील कामगारांनी लढा देऊन तो प्रस्थापित केला आहे. तेव्हा हा निर्णय अन्याय्य आहे. पूर्वीप्रमाणे कामाचे तास सात व मध्ये एक तास विश्रांती असे आठ तास ठरविण्यात यावेत. रोजगार हमी योजनेवर महिला कामगार फार मोठ्या संख्येनी असतात. त्यांनी घरची सर्व कामे आटोपून मुलांचे संगोपन करून कामावर यावे लागते. तेव्हा महिलांवरील या खास कौटुंबिक व पर्यायाने सामाजिक जबाबदाऱ्यांचा विचार करून त्यांच्यासाठी कामाचे तास ६ आणि मध्ये १ तास विश्रांती असे सात तास ठरवून देण्यात यावेत. व त्यासाठी त्यांना संपूर्ण गरजेवर आधारलेले किमानवेतन मिळावे. सात तासापेक्षा अधिक काम करणाऱ्यांना दुप्पट दराने अधिक वेतन देण्यात यावे. समान वेतन कायद्याच्या तरतूदींची अंमल बजावणी रोजगार हमी योजना आणि जवाहर रोजगार योजना कामांवर काटेकोरपणे व्हावी म्हणून खास उपाययोजना सरकारने केली पाहिजे.

**प्रसुतीसाठी सानुग्रह अनुदान १२ आठवड्यांचे करावे**

रोजगार हमी योजनेखाली काम करणाऱ्या महिलांना बाळंतपणापूर्वी १५० दिवस काम त्यांनी केले असेल तर ३०-दिवसांच्या कालावधीचे सानुग्रह अनुदान देण्याची तरतूद आहे. ग्रामीण श्रमिक राष्ट्रीय आयोगाने सादर केलेल्या अहवालात याबाबतीत अशी शिफारस केली आहे की, "ज्यांचे १८ पेक्षा वय जास्त आहे आणि ज्यांच्या कुटूंबाचे उत्पन्न १९९०-९१ च्या किंमतीप्रमाणे रु. ६४०० पेक्षा कमी आहे. अशा सर्व ग्रामीण महिलांना दोन जीवंत बालकांचे बाबतीत १२ आठवडे कालावधीचा प्रत्येक बाळंतपणासाठी फायदा देण्यात यावा. "ही शिफारस रोजगार हमी योजनेवरील महिला मजूरांच्या बाबतीत महाराष्ट्र सरकारने सत्वर अंमलात आणावी. तसेच रोजगार हमी कामावर १५० दिवस काम केले तरच सामुग्रह अनुदानाची सवलत सध्या दिली जाते. पण ही अट व्यवहार्य नाही. पीक हंगामात रो. ह. योजनेची कामे नसतात. आणि राहिलेल्या कालावधीमध्ये १५० दिवस काम मिळणे मुष्कीलीचे असते. तेव्हा ही अट वास्तवास धरून नाही. १५० दिवसांऐवजी ९० दिवस कामाची अट ठेवण्यात यावी.

**रोजगार हमी योजना व किमान वेतन**

किमान वेतन कायद्याच्या तरतूदीनुसार ठरविलेले किमान वेतन रोजगार हमी योजनेवरील अकुशल कामगारांना द्यायचा निर्णय महाराष्ट्र शासनाने १९८५ मध्ये घेतला आहे. १ मे १९८८ पासून अंमलात असलेले शेत मजुरांचे किमान वेतनाचा विचार करून रोजगार हमी योजनेवरील कामगारांना वेतन दिले जात आहे. किमान वेतन ठरविल्यावर किंवा त्यामध्ये पुन्हा सुधारणा केल्यावर दोन वर्षांनी ग्राहक निर्देशांकात ५० नी वाढ झाली की किमान वेतनाची पुनर्रचना करायची आहे. १ मे १९८८ पासून जवळ

जवळ ५ वर्षे झाली आहेत. आणि १९८८ ते १९९३ पर्यंत ग्राहक निर्देशांकात ने वाढ झाली असूनही शेतमजूरांच्या किमान वेतनाची पुनर्रचना करण्यात आलेली नाही. महाराष्ट्रातील लक्षावधी शेतमजूरांवर आणि रोजगार हमी योजनेवर काम करणाऱ्यांवर हा फार मोठा अन्याय केला जात आहे. तेव्हा किमान वेतनाची ताबडतोबीने पुनर्रचना करण्यात यावी व त्याची कार्यवाही १९९० सालापासून करावी. तसेच ग्राहक निर्देशांकात दर सहा महिन्यानी होणाऱ्या वाढीचा विचार करून वाढलेल्या महागाईला शेतमजूरांना तोंड देता यावे म्हणून त्या प्रमाणात विशेष भत्ता मंजूर करून तो किमान वेतनाबरोबर दिला पाहिजे अशी अन्य शेतमजूरांप्रमाणे महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेवरील सर्व कामगारांचीही मागणी रहाणार आहे. तेव्हा शेतमजूर आणि रोजगार हमी योजना कामगारांनी एकत्रीत येऊन या मागणीसाठी नजीकच्या काळात संघर्ष करावा लागणार आहे व त्यांची तशी तयारी होईल या रीतीने शेतमजूर व रोजगार हमी कामगारांत काम करणाऱ्या सर्व संघटनांनी परस्पर सहकार्य करण्याच्या कामात विना विलंब लागले पाहिजे.

# शेतमजूर किमान वेतन

किमान वेतन कायदा १९४८ मध्ये करण्यात आला. जम्मू आणि काश्मीर वगळता सर्व भारतभर हा कायदा १५ मार्च १९४८ पासून लागू झाला. महाराष्ट्र सरकारने या कायद्याखालील नियम मात्र १९६३ मध्ये केले. ते ४ एप्रिल १९६४ ला लागू झाले. अर्थातच तोपर्यंत कायदा १९४८ ला होऊनही किमान वेतन ठरविण्याची प्रक्रिया तोपर्यंत सुरू झाली नव्हती. त्यानंतर परिशिष्टातील भाग एक मध्ये आतापर्यंत ७० उद्योगधंदे समाविष्ट करण्यात आले आहेत. यातील बरेचसे उद्योग शहरातील मोठ्या गावातील असल्याने तेथील कामगार संघटीत झाले. किमान वेतन ठरवून घेण्यासाठी त्यांनी संघर्ष केला. परिणामी ५३ उद्योगातील कामगारांसाठी आतापर्यंत किमान वेतन ठरविण्यात आले आहे, तसेच यापैकी कही उद्योगांमध्ये किमान वेतनाचे वेळोवेळी पुनर्निर्धारण करण्यात आले आहे. आणि वाढत्या महागाईची भरपाई व्हावी या दृष्टीने दर सहा महिन्यांनी निर्देशांकाचा विचार करून खास भत्ता मंजूर करून घेण्यामध्येही या कामगारांना यश मिळाले आहे.

### शेतमजूरांसाठी प्रथम किमान वेतन

कायद्याच्या कलम २ मध्ये उल्लेख केलेल्या परिशिष्ट भाग दोन मध्ये शेतीवर काम करणाऱ्या मजुरांचा अंतर्भाव केलेला आहे. १९७२-७३ मध्ये महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला शेतमजुरांना काय पण अल्पभूधारकावर, मध्यम शेतकऱ्याना जगण्यासाठी वणवण भटकण्याचा, मजुरीसाठी धडपडण्याचा प्रसंग ओढवला. पण दुष्काळामुळे शेत मजूरांच्या, अत्यल्प आणि अल्प भूधारकांच्या दयनीय परिस्थीतीकडे महाराष्ट्रातील आम जनतेचे आणि सरकारचे लक्ष वेधल्यानंतर दुष्काळी कामे मोठ्या प्रमाणावर सुरु झाली. ठिकठिकाणी, गावोगावी, ग्रामीण मजूर, अल्पभूधारक, मध्यम शेतकरी मोठ्या संख्येनी एकत्रीत येऊन दुष्काळी कामे करू लागले. परिणामी संघटनेची प्रक्रिया सुरु होण्यास चालना मिळाली. दुष्काळी कामावरील स्त्री पुरुषांनी २ रुपये ५० पैसे समान वेतन मिळवून घेतले. त्या मध्ये नंतर ५० पैशाच्या सुकडीची वाढ झाली. अशी एकूण ३ रुपये किमान समान मजूरी स्त्री-पुरुष सर्वांना मिळू लागली.

### कायदा झाल्यावर २६ वर्षांनी शेतमजूरांचे किमान वेतन ठरले

१९७२-७३ चा दुष्काळानंतर शेतमजूरांच्या परिस्थितीचा अभ्यास करून किमान वेतन किती असावे याबद्दल शिफारस करण्यासाठी शासनाने एक समिती नेमली. या समितीचे अध्यक्ष शे.का.प.व विरोधी पक्षनेते धुळप होते.

किमान वेतन समितीच्या १९७३ च्या शिफारशी आधाराने किमान वेतन कायदा झाल्यानंतर तब्बल २६ वर्षांनी व स्वातंत्र्यानंतर तब्बल २७ वर्षांनी २८ ऑक्टोबर १९७८ रोजी जाहीरनामा काढून सरकारने मंजूरीचे दर रोखीत ठरवले. शिफारशी मिळाल्यावर किमान वेत जाहिर करायला ५ वर्षे लागली. किमान वेतनासाठी ४ झोन (परिमंडळे) ठरविण्यात आली. झोन चारमध्ये ४ रुपये झोन ३ मध्ये ४ रुपये ५० पैसे, झोन दोन मध्ये ५ रुपये तर झोन एक मध्ये म्हणजे ओलिताच्या शेती विभागात ५ रुपय ५० पैसे किमान वेतन दर ठरविण्यात आला. अशा प्रकारे किमान वेतन कायदा १९४८ मध्ये जरी झाला तरी शेतमजुराचे किमान वेतन ठरवून द्यायला ३० वर्षे लागली, म्हणजे १९७८ साल उजाडले.

### किमान वेतनाचे १९८३ मध्ये पुनर्निर्धारण

चलन फुगवटा, वाढती महागाई यामुळे शेतमजुरांचे जीवन असह्य झाले. असंतोष धुमसू लागला. तेव्हा महाराष्ट्रात शासनाने शेतमजूरांच्या किमान वेतनाचे पुनर्निर्धारण करण्यासाठी पुन्हा श्री. वि. स. पागे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीच्या शिफारशी लक्षांत घेऊन ३१ जानेवारी १९८३ च्या

जाहिरनाव्याने किमान वेतनाचे नव्यानी ठरविलेले दर जाहिर केले. झोन चारमध्ये ६ रुपये, झोन तीन मध्ये सात रुपये, झोन दोन मध्ये ८ रुपये आणि झोन एक मध्ये १० रुपये किमान वेतन ठरवून देण्यात आले.

**१९८८ मध्ये पुन्हा पुनर्निधारण**

शेतमजुराचे किमान वेतन पुन्हा ठरविण्यसाठी श्री. बाळासाहेब विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र सरकारने समिती नेमली, १५ जुलै १९८७ पर्यंत समितीचे काम पुरे करान्ने असे अपेक्षीत होते. ३१ मार्च १९८८ पर्यंत मुदत वाढवावी लागली. यासमितीच्या शिफारशी विचारात घेऊन किमान वेतन पुनः नव्याने ठरविण्यात आले. महाराष्ट्र शासनाने २२ एप्रिल १९८८ रोजी जाहिनामा काढून खालील किमान वेतन ठरवून दिले.

**किमान वेतनाचे दर**

| | झोन १ | झोन २ | झोन ३ | झोन ४ |
|---|---|---|---|---|
| १) रोजंदारी | रु. २०/- प्रतिदिन | रु. १६/- प्रतिदिन | रु. १४/- प्रतिदिन | रु. १२/- प्रतिदिन |
| २) महिनेदार | रु. ६४०/- दरमहा | रु. ५२०/- दरमहा | रु. ४६०/- दरमहा | रु. ४००/- दरमहा |
| ३) सालदार सालकरी वार्षिक वेतन | रु. ७६८०/- दरवर्षी | रु. ६२४०/- दरवर्षी | रु. ५५२० दरवर्षी | रु. ४८००/- दरवर्षी |

**उर्जेवर, वाफेवर किंवा तेलावर चालणाऱ्या मंत्रावर काम करणारे शेतमजूर**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) रोजंदारी | रु. २४/- प्रतिदिन | रु. २०/- प्रतिदिन | रु. २०/- प्रतिदिन | रु. २०/- प्रतिदिन |
| २) महिनेदार | रु. ८००/- दरमहा | रु. ६४०/- दरमहा | रु. ६४०/- दरमहा | रु. ६४०/- दरमहा |
| ३) सालदार सालकरी वार्षिक वेतन | रु. ९६००/- दरवर्षी | रु. ७६८०/- दरवर्षी | रु. ७६८०/- दरवर्षी | रु. ७६८०/- दरवर्षी |

**परिमंडळ - १**

अ) मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर, सोलापूर, ठाणे, पिंपरी-चिंचवाड, नाशिक, औरंगाबाद या महानगरपालिका.

ब) पुणे आणि खडकी कॅन्टोमेंटची क्षेत्रे.

क) शासनाच्या जलासंचन योजना व उपसा जलासिंचन योजनांतर्गत बारमाही पाणी मिळणारी जलप्रदाय क्षेत्रे (कमांड एरिया)

**परिमंडळ - २**

अ) "अ" वर्गीय नगरपालिका - कल्याण, भिवंडी, उल्हासनगर, डोंबिवली, अंबरनाथ, मालेगाव, धुळे, भूसावळ, अहमदनगर, सातारा, सांगली, मिरज इचलकरंजी, जालना, परभणी, बीड, नांदेड, लातूर, अकोला, अमरावती, अचलपूर, यवतमाळ, वर्धा, गोंदिया आणि चंद्रपुर.

ब) "ब" वर्गीय नगरपालिका - वसई, पनवेल, खोपोली, रत्नागिरी, मनमाड, नंदूरबार, शिरपूर-वरवडे, अंमळनेर, चाळीसगाव, चोपडा, पाचोरा, श्रीरामपूर, संगमनेर, कोपरगाव, लोणावळा, बारामती, कराड, फलटण, इस्लामपूर, बार्शी, पंढरपूर, हिंगोली, परळी-वैजनाथ, आंबेजोगाई, उदगीर, उस्मानाबाद, खामगाव, मलकापूर, बुलढाणा, शेगाव, आकोट, कारंजा, वाशीम, अंजनगावसुर्जी, बडनेरा, वणी, पुसद, हिंगणघाट, आर्वी, पुलगव, कामठी, उमरेड, भंडारा, तुमसर आणि बल्लापूर.

क) देहूरोड, अहमदनगर, औरंगाबाद, कामठी, नाशिक रोड, देवळाली ही कॅन्टोमेंट क्षेत्रे.

इ) सरकारी धरणापासून हंगामी पाणी मिळू शकणारी क्षेत्रे.

**परिमंडळ - ३**

१, २, व ४ मध्ये समाविष्ट न झालेले क्षेत्र

**परिमंडळ - ४**

परिमंडळ १ व २ मधील (कमांड एरिया) व हंगामी पाणीपुरवठ्याचे क्षेत्र वगळून सुखटणकर समितीने निश्चित केलेली अवर्षणप्रवण क्षेत्रे.

शेतमजुरांचे किमान वेतनाच्या अनुषंगाने निश्चित करण्यात आलेल्या महत्त्वाच्या बाबी पुढील प्रमाणे आहेत.

१) १८ वर्षाखालील शेतमजुरांचे किमान वेतन हे संबंधीत परिमंडळातील प्रौढ अकुशल कामगारांसाठी ठरविलेल्या वेतनाच्या ६० टक्के असावे.

२) सध्या सालवार म्हणून काम करणाऱ्या शेतमजूराला वर्षातून २४ पगारी सुट्ट्या व महिनेदार म्हणून काम करणाराला महिन्यातून दोन पगारी सुट्ट्या देण्याची तरतूद आहे. मात्र या सुट्ट्यांव्यतिरिक्त सालवार आणि महिनेदार शेतमजूरांना राष्ट्रीय सणाच्या सुट्ट्या म्हणजे २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन, १ मे महाराष्ट्र दिन आणि १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन रोजी देण्यात याव्यात.

३) वस्तुरुपात देण्यात येणारे वेतन - महाराष्ट्रातील परंपरागत पद्धती व आज अस्तित्वात असलेली पद्धती विचारात घेता वस्तुरुपात देण्यात येणाऱ्या वेतनाची पद्धती पुढे चालू रहारी.

४) सर्व साधारणपणे प्रतिदिन कामाचे ७ तास व विश्रांतीचा एक तास असे एकूण ८ तासाहून जास्त असू नयेत.

### पाच वर्षे होत आली - पुनर्रचना नाही

महाराष्ट्र राज्यात १२ एप्रिल १९८८ रोजी म्हणजे सुमारे ५ वर्षापूर्वी सेतमजूरांच्या किमान वेतनाची पुनर्रचना केली त्यावेळी असे स्पष्टपणे नमूद केले होते की दर दोन वर्षांनी या वेतनाची पुनर्रचना केली जावी अथवा महागाई निर्देशांकात जर ५० नी वाढ झाली तर किमान वेतनाची पुनर्रचना करण्यात यावी तसेच दर सहा महिन्यांनी महागाई निर्देशांकानुसार खास भत्ता देण्याची तरतूद असावी पण या शिफारशीकडे महाराष्ट्र शासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. डॉ. सी. एस. हनुमंतराव यांच्या अध्यक्षतेखालील ग्रामीण मजूर राष्ट्रीय आयोगाने ३१ जुलै १९९१ रोजी सादर केलेल्या अहवालात अशी शिफारस केली आहे की "प्रत्येक सहा महिन्यानी महागाई वाढली की वाढलेल्या निर्देशांकाचे आधारावर आपोआप किमान वेतन वाढवावे, तसेच दर दोन वर्षांनी किमान वेतनाची पुनर्रचना करण्यात यावी. परंतु आयोगाच्या या शिफरशीप्रमाणे महाराष्ट्र सरकारने अद्याप पर्यंत काहीएक कार्यवाही केलेली नाही.

### इतर राज्यातील शेत मजूरांचे किमानवेतन

महाराष्ट्र राज्यात शेतमजूरासाटी ठरविलेल्या किमान वेतनाची इतर राज्यातून शेतमजूरांसाठी ठरविलेल्या किमान वेतनाची तुलना केली तर आपल्याला काय आढळून येते. भारतातील इतर राज्यात ठरविलेल्या वेतनापेक्षा ते कमी आहे. त्या दृष्टीने खालील माहीती उद्बोधक आहे.

| राज्य | कोणत्या तारखेपासून | ठरविलेला किमान वेतन दर |
|---|---|---|
| महाराष्ट्र | १ मे १९८८ | १२ ते २० रुपये |
| उत्तर प्रदेश | २९ जानेवारी ८९ | १८ रुपये |
| आसाम | १ जुलै १९८८ | १९ रुपये |
| पश्चिम बंगाल | १ ऑक्टोबर १९८८ | १९-६५ रुपये |
| मिझोरम | १ नोव्हेंबर | २८ रुपये |
| हरयाणा | १ सप्टेंबर १९८९ | ३१-७५ रुपये |
| पंजाब | १ ऑक्टोबर ८९ | ३३ रुपये |
| केरळ | ऑगष्ट ९२ | पु.४० रुपये<br>स्त्री ३० रुपये |

महाराष्ट्र शासनावर धनीक शेतकऱ्यांचे जबरदस्त वर्चस्व आहे. त्यामुळ महाराष्ट्रातील किमान वेतन इतर राज्यांपेक्षाही कमी आहे. ही उघड उघड वस्तुस्थिती आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांचा उठसूट जप करणारे त्यांच्या नावाने कारभार करणारे महाराष्ट्र शासन कितीही पुरोगामीपणाची प्रौढी मिळवत असले तरी शेतमजुरांचे बाबतीत ते प्रतिगामी आहे हे यावरून सिद्ध होत आहे.

### धान्याच्या आधार किंमती वाढत आहेत.

महागाई कितीही वाढली तरी शेतमजुरांचे किमान वेतन मे १९८८ पासून गोठविलेले आहे. ज्यांच्या शेतात हे मजूर काम करतात त्या शेतकऱ्यांना मात्र शासनाकडून वेगळा न्याय दिला जात आहे. शेतकऱ्यांच्या उत्पादनाच्या आधार किंमती १९८८ पासून सातत्याने दरवर्षी वाढवून दिल्या आहेत. या वर्षाच्या खरीप

हंगामासाठी धान्याच्या आधार किंमती १ सप्टेंबर १९९२ ला जाहिर झाल्या आहेत. किंमतीमध्ये भरघोस वाढ दिली आहे. गेल्या वर्षीही असेच भाव वाढवून दिले होते.

| | १९९२-९३ ची दरवाढ क्विंटल माग | ९१-९२ दरवाढ क्विंटल मागे |
|---|---|---|
| भात | ४० | २५ |
| कडधान्य | २५ ते ३० | २५ ते ३० |
| डाळी | ९५ | उपलब्ध नाही |
| कापूस | १०५ ते १३० | |
| तेलबिया | १०५ | ६५ |
| सनफ्लॉवर | १३० | ७० |

शेतकऱ्यांची शेती तोट्यात जाऊ नये, फायद्याची व्हावी म्हणून आधार किंमतीत वाढ करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळाला तर त्याबद्दल शेतमजूरांना आनंदच वाटणार आहे. परंतु धान्य, डाळी, कापूस, तेलबिया, ऊस वगैरेच्या दरवर्षी आधार किंमती वाढवून दिल्या जात असताना, महागाई प्रचंड वाढत असताना शेतमजूरांचे किमान वेतन १९८८ पासून गोठविण्यात आले आहे. वाढलेल्या महागाईची भरपाई व्हावी म्हणून त्याना खास भत्ताही ठरवून दिलेला नाही. हा तर अगदी उघडउघड अन्याय आहे. शेतीमालाची किंमत ठरविताना शेतमजुराची मजुरी ध्यानात ठेवून किमती ठरविल्या जातात पण शेतमजुराची मजुरी मात्र आहे तीच महाराष्ट्रात ठेवून शेतमजुरांच्या दुखावर डागाच्या दिल्या जातात काय हा घोर अन्याय.

**महागाई वाढली तरी किती आहे.**

इंडियन बेलब जर्नल मध्यो औद्योगिक कामगारांचा निर्देशांच्या संदर्भात दरमहिन्याला सरासरी ग्राहक किंमती प्रसिद्ध होतात. कामगारांना अत्यावश्यक वस्तूच्या किमती त्यात दर्शविलेल्या असतात. नागपूर आणि सोलापूर येथील मे १९८८ आणि सप्टेंबर ९१ च्या किंमतीच फक्त आपण येथे पहाणार आहोत.

| अनु. | वस्तू | माप | नागपूर | | सोलापूर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे १९८८ | सप्टेंबर ९१ | मे ८८ | सप्टेंबर ९१ |
| १ | तांदुळ | किलो | ३-७८ | ५-१९ | ३-२५ | ६०७६ |
| २ | गहू | किलो | २-४४ | ३-६३ | २-३० | ३-१६ |
| ३ | जवार | किलो | ३-२७ | २-९७ | २-८४ | ४-१६ |
| ४ | तुरडाळ | किलो | ११-७८ | १९-०२ | ११-५० | १८-७५ |
| ५ | गोडेतेल | किलो | २३-१८ | ४१-२१ | २२-७५ | ३८-०० |
| ६ | वनस्पती तूप | किलो | २८-९८ | ४६-९६ | २९-७२ | ४५-०० |
| ७ | साखर | किलो | ६-०२ | ७-४६ | ५-४९ | ६-६७ |
| ८ | रॉकेल | लिटर | २-१७ | २-४३ | २-३० | २-५५ |

ग्राहक निर्देशांकात मे १९८८ पासून डिसेंबर ९२ पर्यंत खालिल प्रमाणे वाढ झाली आहे.

मे १९८८ मध्ये किमान वेतनाची पुनर्रचना झाली तेव्हा निर्देशांक ७७७ होता. डिसेंबर १९९२ मध्ये तो १३६७ झाला. म्हणजे निर्देशांकात ५९० ने वाढ झाली.

शेतमजुराला दैनंदिन जीवन जगण्यासाठी म्हणजे कसेतरी जीवंत राहण्यासाठी जे अन्न खावे लागते त्याच्या खर्चामध्ये भाववाढीमुळे काय फरक पडला आहे हे पहाणे येथे उपयुक्त ठरेल. १७ ऑगस्ट १९९२ च्या महाराष्ट्र टाईम्स मध्ये महागाई रोखण्यासाठी नफा गोठविणे आवश्यक हा संजीव साने यांचा लेख आला आहे. माणसाला निव्वळ जीवंत राहण्यासाठी असलेल्या वस्तुंचे दर १९८८-८९ ते १९९२ पर्यंत किती वाढले आहेत त्यामुळे प्रत्येक माणसाच्या दर दिवसाच्या खर्चात किती वाढ झाली हे दर्शविणारे तक्ते या लेखात दिले आहेत.

**तक्ता क्रमांक एक**

| नाव | वर्ष ८८-८९ | ८९-९० | ९०-९१ | ऑगस्ट ९२ |
|---|---|---|---|---|
| तांदुळ, मसुरी | ४-६० | ६-५० | ७-०० | ८-५० |
| गहू १४७ एम.पी | ४-१० | ४-५० | ५-०० | ९-०० |
| तूरडाळ | १०-५० | ११-५० | १६-०० | २०-०० |
| चनाडाल | ८-०० | १०-०० | १२-५० | १३-५० |
| मसूरडाळ | ७-०० | १०-३५ | १२-५० | १५-०० |
| ज्वारी | ३-५० | ४-६० | ५-२५ | ७-५० |
| गुळ | ६-५० | ८-५५ | १०-२५ | १२-५० |
| साखर | ७-०० | ८-५५ | १०-२५ | ९-८० |
| चहापावडर | ४४-०० | ५५-०० | ७०-०० | ७६-०० |

तक्ता क्रमांक २

| नाव | वजन | कॅलरीज | ८८-८९ पैसे | ८९-९० पैसे | ९०-९१ पैसे | ऑगष्ट ९२ पैसे | झालेली पैसे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तांदुळ, मसुरी | २०० ग्रॅम | ६९० | ९२ | १३० | १४० | १७० | ७८ |
| गहू १४७ एम.पी | २०० ग्रॅम | ६८२ | ८२ | ९० | १०० | १८० | ९८ |
| भाजी | २०० ग्रॅम | १०० | १६० | २४० | २८० | ३२० | १६० |
| तूरडाळ | १०० ग्रॅम | ४०० | १०५ | ११५ | १६० | २०० | ९५ |
| साखर | १०० ग्रॅम | ६४० | ७० | ८५ | १२० | ९८ | २८ |
| चहापावडर | १५ ग्रॅम | -- | ६६ | ८२ | १०५ | ११४ | ४८ |
| गोडेतेल | २५ ग्रॅम | २२५ | ७५ | ७० | १०६ | ९० | १५ |
| | ८४० | २७३७ | ६५० | ८१२ | १०११ | ११७२ | ५२२ |

ऑगस्ट १९९२ ला प्रत्येक माणसाला ११ रु.७५ पैसे खर्च करावे लागतात. माणशी ५२२ पैशांची वाढ झाली असल्याचे तक्ता क्रमांक दोन वरून स्पष्ट होत आहे. शेतमजूरांचे कुटुंबात १ पुरुष १ स्त्री व २ मुले अशा तीन घटकाचे कुटुंबाला या हिशेबाने निव्वळ अन्न खर्च रु. ३५-२५ करावा लागणार आहे. सध्या मिळणाऱ्या १२ रुपये किमान वेतनात एका माणसाचा केवळ अन्नखर्च भागू शकेल. शेतमजुरांच्या किमान वेतनात गेल्या ५ वर्षात वाढ न झाल्यामुळे शेतमजुराची त्यांच्या मुलाबाळांची उपासमार होत आहे. परिणामी कुपोषणामुळे मृत्यूमुखी पडणाऱ्या आदिवासी, दलित, भटक्या विमुक्तांची संख्या दिवसानूदिवस वाढतच जाणार आहे. अन्न धान्य बाजारात उपलब्ध असूनही ते विकत घेण्याची आर्थिक ताकद नसल्याने अन्नाअभावी शेतमजूर झिजून झिजून मरणाच्या पंथाला लागत आहेत. सर्वात प्रथम त्यांची मुले दगावतात. ठाणे व धुळे जिल्ह्यात हे सुरू झालेच आहे.

**वन कामगार, बांधकाम कामगारांना काय मिळते**

ग्रामीण भागात शेतमजुरांव्यतिरीक्त सरकारी खात्यातील रोजंदारीवर काम करणारे मजूर असतात. विशेषतः वन आणि बांधकाम खात्याकडे अकुशल काम करणारे आहेत. त्यांना किमान वेतन आणि महागाई भत्ता किती मिळतो हे पहाण योग्य ठरणार आहे.

महाराष्ट्रातील बांधकाम मजुरांना ५ ऑक्टोबर १९८४ च्या शासनाच्या निर्णयाप्रमाणे मुळ वेतन व त्या सोबत महागाई भत्ता मिळून एकूण वेतन निर्धारीत केले. दर सहा महिन्यानी वाढलेल्या महागाईची सरासरी काढून प्रत्येक वर्षाच्या जानेवारी ते जुनसाठी जानेवारी महिन्यांत तर जून ते डिसेंबरसाठी जुलै महिन्यात जाहिर करतात. तीन झोन पाडलेल आहेत. प्रत्येक झोनसाठी वेगवेगळे दर ठरविलेले आहेत. झोन तीन मध्ये नगरपरिषदेचे क्षेत्र वगळता जिल्ह्यातील सर्व भागातील बांधकाम कामगार समाविष्ट होतात. तेव्हा या झोनमधील कामगारांकरिता जानेवारी १९९२ ते जुन १९९२ रोजी जाहिर झालेले किमान वेतन महागाईभत्ता खाली नमूद केल्याप्रमाणे दिला जात आहे.

| झोन नं. ३ | रोज वेतन | महागाई | एकूण |
|---|---|---|---|
| अकुशल | १०-०० | ३५-४९ | ४५-४५ |
| अर्ध कुशल | १३-०० | ३५-४५ | ४८-४५ |
| कुशल | १५-०० | ३५-४५ | ५०-४५ |
| अतिकुशल | २१-०० | ३५-४५ | ५६-४५ |

बांधकाम कामगारांचा खास भत्ता (महागाई) १-१०-८४ ते ३१-६-८४ ला अवघा ३-४० होता तो आता वाढून १-१-९२ ते ३०-६-९२ ला रु. ३५-४५ झाला आहे.

जंगल खात्याकडे काम करणाऱ्या वन वाटिकेमधील आणि किमान वेतनाचे दर १५ मे १९८६ च्या सरकारी निर्णयानी ठरविण्यात आले आहेत. या मजूरानाही वेतनासोबत खास भत्ता दिला जातो. मुंबई ग्राहक निर्देशांक (नवा) ६०४ वर आधारित हा खास भत्ता आहे. बारा महिन्यांच्या ग्राहक किंमती निर्देशांकाची सरासरी वाढ विचारात घेऊन ६०४ वरील प्रत्येक ५ अंकाच्या वाढीसाठी प्रतिदिन १० पैसे या प्रमाणे भरपाईभत्ता देण्यात येतो. दरवर्षी ऑगष्ट मध्ये ऑगष्ट ते जुलै या काळासाठी महागाई भत्ता जाहिर करण्यात येतो. ऑगष्ट १९९१ ते जुलै १९९२ या बर्षाचा विचार करून १ ऑगष्ट १९९२ रोजी खास भत्ता ठरविलेला आहे. वनमजुरांना मिळणारे सध्याचे एकूण वेतन खालीलप्रमाणे आहे.

| वर्गवारी | वेतन | दरदिवसासाठी भत्ता ऑगष्ट ९१ ते जुलै ९२ | एकूण वेतन |
|---|---|---|---|
| कुशल | १८-०० | ९-५० | २७-५० |
| अकुशल (जड) | १६-०० | ९-५० | २५-५० |
| अकुशल (हलके) | १४-०० | ९-५० | २३-५० |

वन कामगाराना ऑगष्ट १९८६ ते ३१ जुलै १९८७ चा भत्ता अवघा ०-४० पैसे होता. तो वाढता वाढता ९-५० झाला आहे. ग्रामीण भागात काम करणारे शेतमजूराना १९८८ पासून रु. १२ ते २० चे दरम्यान संबंधीत झोनप्रमाणे मिळतात. त्यांच्या तुलनेत वनकामगार आणि बांधकाम कामगार याना मिळणाऱ्या रोजंदारीतील फरक खुपच जाणवणारा आहे. ग्रामीण भागातीलच अकुशल वन कामगाराला दररोज रु. २३-५० तर अकुशल बांधकाम कामगाराला दररोज रु. ४५-४५ मिळतो. बांधकाम आणि वन कामगार संघटीत आहेत. त्यांनी मागण्या करून वेळोवेळी चिकाटीने लढे देऊन महागाई भत्ता शासनाकडून मिळवला आहे. या कामगारांप्रमाणेच शेतमजूर ग्रामीण भागातील आहेत. पण ते संघटीत नाहीत आपल्या मागण्या मांडत नाहीत त्यासाठी संघर्ष करत नाहीत. हाच फरक हेच त्यांच्या हालाखीच्या जीवनाचा पुरावा धरावयास हवा.

**अन्य अकुशल नोकरवर्ग**

ग्रामीण भागात अकुशल काम करणारा कोतवाल, मुलकी शिपाई, कॉन्स्टेबल, राउंड फॉरेस्टर इत्यादी वेगवेगळ्या खात्याचा नोकरवर्ग आहे. त्याचे काम अनुत्पादक असते. यापैकी कोतवालाना सध्या दरमहा रु.९००-०० मिळतात १९८८ मध्ये त्यांना रु.        मिळत होते. सरकारी नोकरीत असलेल्याना पेन्शन मिळू शकणाऱ्या नोकराना दरमहा रु. १२००-०० ते रु. १५००-०० मिळतात निर्देशांकाप्रमाणे त्याना महागाई भत्ताही वेळोवेळी वाढून मिळतो. ग्रामीण भागातील या अशा शासकीय आणि निमशासकीय नोकरांच्या संघटना आहेत. संघटनानी केलेल्या अविरत प्रयत्नामुळे आज ते या स्थितीला पोहोचले आहेत. हे लक्षात घ्यावे लागेल. या नोकरवर्गाला मिळणाऱ्या मासीक वेतनाची तुलना शोतमजूराला दिल्या जाणाऱ्या रोजंदारीशी करणे आज तरी हास्यास्पद ठरते.

**किमान वेतन दारीद्रय्र रेषेच्या जवळपासही नाही.**

दारिद्रय़ रेशेखाली असलेल्या कुटुंबाचे सर्वेक्षण प्रथम करण्यात आले तेव्हा वार्षिक उत्पन्न रु.६०००/- पेक्षा कमी असेल ते कुटुंब दारीद्रय़रेषेखाली धरून घेतले जात होते. आता १९९१-९२ च्या किंमतीवर आधारित ज्याचे वार्षिक कुटूंब रु. ११०००-०० पेक्षा जास्त नाही अशी कुटूंबे दारीद्रय़ रेषेखाली मानून त्यांची यादी तयार करण्याचे काम चालू करण्यात आले आहे. शेतमजूराला अगदी रोज काम मिळाले तरी त्याला दरमहा मिळणारे उत्पन्न जुन्या आणि नव्या दारीद्र्यरेषेपेक्षा खूपच कमी आहे. कोणत्याही कामगाराचे किमान वतन दारीद्रय्र रेषेखाली असता कामा नये हे तत्त्व शासनाने मान्य केले आहे. परंतु हे तत्त्व शेतमजूरांच्या बाबतीत महाराष्ट्र शासनांनी गेले कित्येक वर्षे व्यवहारात आणलेले नाही, त्यामुळे लाखो शेतमजूरांना व त्यांच्या कुटूंबीयांना दारीद्रय़ रेषेखाली जीवन कंठावे लागत आहे. त्यांचे भयानक शोषण होत आहे. महाराष्ट्र शासनाचा हा गुन्हेगारी निष्काळजीपणा (क्रिमीनल निग्लीजन्स) सामजला पाहिजे.

### ग्रामीण श्रमीक राष्ट्रीय आयोगाची शिफारस

ग्रामीण श्रमिक राष्ट्रीय आयोगाने ३१ जुलै १९९१ मध्ये दिलेल्या अहवालात इतर अनेक शिफारशींबरोबर शेतमुजरांच्या किमान वेतनाबाबत एक महत्त्वाची शिफारस केली आहे. शेतमजूरांचे मूळ किमान वेतन डिसेंबर १९९० ला रु. २०/- असावे. राज्य सरकारनी रु. २०/- पेक्षा जास्त किमान वेतन ठरविले तर त्याला हरकत नाही परंतु कोणत्याही परिस्थितीत रु. २०/- पेक्षा कमी किमान वेतन राज्य सरकारनी ठरवू नये असे स्पष्टपणे या अहवालात नमूद केलेले आहे. या शिफारशीची अंमलबजावणी महाराष्ट्र शासनाने केली नाही. अहवाल सरकारकडे येऊन दीड वर्ष झाले. पण महाराष्ट्र शासन या बाबतीत थंड आहे. राष्ट्रीय आयोगाच्या शिफारशी अमलात आणण्यासाठी महाराष्ट्राचे मजूर राज्यमंत्री अरूण मेहता यांचे अध्यक्षतेखाली १२ राज्यांच्या मंत्र्यांची एक समिती केंद्र सरकारने १४ ऑगष्ट १९९२ रोजी नेमली, त्यानंतर अरूण मेहताना राज्य मंत्रीपद सोडावे लागले. त्यानंतर या समितीचे पुढे काय झाले हे गुलदस्तात आहे. महाराष्ट्र शासन तसेच केंद्रीय शासन या बाबतीत उदासीन असल्याचा अनुभव येत आहे.

### खासदार चांदाराम यांची आयोगाशी मतभेद

ग्रामीण मजूर राष्ट्रीय आयोगानी २० रुपये किमान वेतन देण्याबद्दल जी शिफारस केली आहे त्याबाबत आयोगाचे सदस्य हरयानाचे खासदार चांदराम यांनी मतभेद व्यक्त करून आपले भीन्न मन मांडले आहे. हे भीन्न मत मांडताना त्यांनी असे प्रतिपादन केले आहे की,

ग्रामीण भागातील एकूण लोकसंख्येमध्ये एक तृतियांश हे शेतमजूर आहेत. त्यांच्यामध्ये समाजातील दुर्लक्षित झालेले अनुसूचित जाती आणि अनूसिचित जमातीचे लोक बहुसंख्येने आहेत. त्यांची भयानक पिळवणूक होते. हिरव्या क्रांतीमध्ये शेती विकासामध्ये शेतमजूरांचे मोठे योगदान आहे. देशातील विभागाविभागातून भिन्न भिन्न शेतमजूरी दिली जाते. ही वस्तुस्थीती आहे. परंतु संबंध देशभरात अत्यावश्यक वस्तुंचे विक्रीदर सर्वसामान्यपणे सारखे आहेत. ही देखील सत्यस्थिती आहे. जीवनमान आणि वेतनदर यांचा एकमेकांशी घनिष्ट संबंध आहे. पंजाब हरयाणा आणि उत्तर प्रदेशात सध्याचा प्रचलित मजूरीचा दर प्रतिदिन रु. ३५-०० आहे आणि कापमीच्या हंगामात या दरात वाढ होते. जर कोणत्या राज्यात १५ रुपयांपेक्षा कमी वेतनदर असेल तर ग्रामीण मजुरांच्या संघटनेमध्ये काहीतरी निश्चितच दोष आहे. केंद्रीय सरकारने कायदा करून या देशभर एकसारखे किमान वेतन ठरविण्याची जबाबदारी आयोगाकडे सोपविलेली होती. शेतीमधील मजुरांचे हितरक्षण करण्यासाठी हे सर्व होते. ज्या राज्यातून किमान वेतन पुरेसे ठरविले आहे तेथे ते केंद्रीय कायद्याने कमी होता कामा नये. ज्या राज्यातून जास्त वेतन मिळते त्या राज्यात जवळ जवळ १ कोटी ग्रामीण मजूर कामाच्या शोधात स्थलांतरीत असल्याचा अंदाज आमच्या रिपोर्टात केलेला आहे. प्रजासत्ताक, समाजवादी आणि कल्याणकारी राज्याला हे शोभणारे आहे का ? ओरिसा, बिहार, राजस्थान या राज्यांतून खूप लांब पंजाबात मजूर स्थलांतरीत होणे माणुसकीच्या दृष्टीने लाजीरवाणे नाही का ? तेव्हा आपण असे पाहिले पाहजे की प्रत्येक ग्रामीण मजूराला सारखे जीवन वेतन मिळेल. कारण त्यानी उत्पादित केलेल्या मालाला सर्वत्र एकच किंमत मिळते.

या विषयावर लोकसभेत झालेल्या चर्चांचा मी अभ्यास केला आहे. १९ ऑगष्ट १९९० आणि ३० ऑगष्ट १९९० रोजी राज्यसभेत झालेल्या चर्चेमध्ये श्री व्ही. नारायण स्वामी आणि श्री. जे. एस. बसू यानी प्रतिदिन ३५ रुपये रोजगार मिळावा असे सूचविले आहे. केरळ आणि पश्चिम बंगाल मध्ये एवढे वेतन मिळते हे ही त्यांनी मांडले आहे. खासदार श्री. धर्माप्रसाद वर्मा यांनी १९९० मध्ये विधेयक क्रमांक ३० लोकसभेत मांडले त्यातील क्लॉन ६ मध्ये प्रतिदन मजूरी रु. ३०-०० आणि दरमहा रु. ७००-०० सुचविली होती. २६ व्या मजूर मंत्री परिषदेने शिफारस केल्याप्रमाणे प्रॉव्हीडंट फंड, वृद्धापकाळातील निवृत्ती वेतन,

आजारीपण आणि अपंगत्व अलौन्स वगैरेची तरतूद असणाऱ्या केरळ ॲग्रीकल्चरल वर्कर्स ॲक्ट १९७४ च्या धर्तीचा केंद्रीय कायदा करण्यात यावा अशी सूचना खासदार चित्त बसू यांनी लोकसभेत बील क्रमांक ३२/१९९० मांडतांना केली होती. शेतमजुरांना नेहमीचे कमी मजुरीत राबविण्यात येते. त्यांची उपासमार होते. वर्षाच्या बऱ्याच मोठ्या कालावधीमध्ये ते बेकार असतात. कामाची सुरक्षीतता नसते. म्हातारपणाचे निवृत्ती वेतन नाही. आणि रडत खडत काम करतानाच ते मृत पावतात. म्हणून मी ग्रामीण मजूरांसाठी प्रतिदिन रु. ३५/- वेतन मिळाले अशी शिफारस करत आहे. कमिशन सदस्यांनी प्रतिदिन रु. २०-०० वेतनाची शिफारस केली आहे. भरमसाठ महागाई वाढत असतानाच्या या काळात या शिफारशीमध्ये मला काही तार्किक न्याय दिसत नाही. ते वाजवी तर नाहीच नाही पण जीवन वेतनही नाही.

बहुसंख्य भूधारकांकडून शेतमजूरांवर सामाजित आणि आर्थिक बहिष्कार टाकण्याची अती निर्लज्ज आणि अवमानास्पद प्रचलित प्रथा मोडून काढायची असेल तर माझ्या मते किमान वेतनाची म्हणजेच जीवन वेतनाची काटेकोरपणे अंमलबजावमी झाली पाहिजे.

शेतमजूरांच्या हितसंबंधाचा सर्व दृष्टीने विचार करून प्रतिदिन रु. ३५-०० किमान वेतन शेतमजूराला दिले गेले पाहिजे. या खाकदार चांदिराम यांच्या मताशी रोजगार हमी योजना समन्वय समिती निश्चितच सहमत आहे.

**मार्गदर्शक सूत्राप्रमाणे होणारे किमान वेतन**

१५ वी मजूर मंत्री परीषद आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये शेतमजूराचे किमान वेतन ठरविताना खालील मार्गदर्शक सूत्राचा अवलंब करावा अशी शिफारस आयोगाने केली आहे.

नवरा बायको व दोन मुले म्हणजे युनीट्स धरावेत. कुटूंबामध्ये एकजण कमावता मानावा. कुटूंबातील स्त्री व मुलांचे उत्पन्न लक्षात घेऊ नये.

१) अन्नाची गरज - इंडियन कोन्सील ऑफ मेडीकल रिसर्चने शिफारस केलेली अन्नाची गरज पुरुष ३९०० कॅलरीज स्त्री ३००० कॅलरीज मुलगा/मुलगी वय वर्षे १३ - २५०० कॅलरीज मुलगा/मुलगी वय वर्षे ७-१८००. कॅलरीज म्हणजे एका कुटूंबाची आवश्यकता ११,२०० कॅलरीज धरावी.

२) कपड्याची गरज - कपड्याची दरवर्षीची गरज दर व्यक्तीगणीक १८ यार्ड म्हणजे कुटूंबाची गरज ९२ यार्ड धरण्यात यावी.

३) निवारा - सरकारी गृह योजनेनुसार ठरविण्यात आलेले किमान जागेसाठिचे भाडे धरावे.

४) इंधन व वीज वगैरे साठीचा खर्च

वरील १ + २ + ३ च्या एकूण खर्चाच्या २० टक्के धरण्यात यावा.

५) सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार मुलांचे शिक्षण, वैद्यकिय सेवा, करमणूक, सण, उत्सव इत्यादी खर्चासाठी एकूण किमान वेतनाच्या २५ टक्के एवढी रक्कम धरायचे आहे.

वरील मार्गदर्शक सूत्रांप्रमाणे ऑगष्ट १९९२ बजारभाव लक्षात घेऊन शेतमजूरास किती किमानवेतन मिळायला पाहिजे हे आपण पाहूया.

१) **अन्नाची गरज** - एका कुटूंबाची एका दिवसाची आवश्यकता ११,२०० कॅलरीज ऑगष्ट ९२ च्या बाजारभावाप्रमाणे २७३७ कॅलरीजसाठी रुपये ११.७५ खर्च येतो म्हणजेच ११,२०० कॅरलीजना ४८ रुपये खर्च येणार आहे.

२) **कपड्याची गरज** - दरवर्षीची गरज ७२ यार्ड म्हणजे ६६-५ मीटर कापड

सरासरी रु.१५-०० मीटर भाव धरला तरी ग्रामीण कष्टकरी कुटूंबाला कपड्यावर एकूण खर्च रु.९९७-५० म्हणजे किमान रोज रु.२-७५ खर्च करावे लागतील.

३) **निवारा** - सरकारी गृहयोजनेनुसार ठरविलेले किमान भाडे.

दरमहिन्याचे कमीतकमी रु.५०-०० धरले तर वर्षाला रु.६००-०० म्हणजे एका दिवसाचे रु.१-६५ होतात.

इंधन विज वगैरेसाठीचा खर्च - वरील १ + २ + ३ या एकूण खर्चाच्या २० टक्के

सूत्र १ - ४८-००

सूत्र २ - २-७५

सूत्र ३ - १-६५

५२-४०

५२-४० चा २० टक्के १०-५० होतात.

५) सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार मुलाचे शिक्षण, वैद्यकिय सेवा, करमणूक, सण, उत्सव इत्यादि खर्चासाठी वरील १ + २ + ३ + ४ च्या एकूण खर्चाच्या २५ टक्के धरायचे आहेत.

सूत्र १ - ४८-००
२ - २-७५
३ - १-६५
४ - १०-५०

६२-९०

६२-९० चा २५ टक्के १५-७०

या हिशेबाने शेतमजूरास शास्त्रियदृष्ट्या मिळण्यास पात्र असलेले किमान वेतन हे वरील १ ते ५ ची बेरीज होईल. ते खालील प्रमाणे होईल.

सूत्र १ - ४८-००
२ - २-७५
३ - १-६५
४ - १०-५०
५ - १५-७०

७८-६०

याचा अर्थ ऑगष्ट १९९२ चे बाजारभाव विचारात घेता शेतमजूरास किमान वेतन रु.७८-६० मिळायला हवे.

**मागणी काय राहील**

परंतू वर उल्लेखलेले किमान वेतन रु.७८-६० शेतमजूरास मिळाले पाहिजे अशी मागणी करणे विविध कारणांमुळे व्यवहार्य ठरणार नाही. श्रमिक मजूर आयोगाची शिफारस सद्यस्थितीत पटण्याजोगी नसली तरीही ती पायाभूत समजून शेतमजूरांची किमान वेतनाबद्दलची मागणी मांडळे जास्त व्यवहार्य आणि सयुक्तीक ठरेल असे वाटते. अशी मागणी जनतेला पटवून द्यायला सोपे पडणार आहे. तसेच मागणीचा विचार करायला किंवा ती मान्य करायला उघडविरोध करु शकणार नाही.

आयोगाने सुचविल्याप्रमाणे ग्रामीण मजूरांना डिसेंबर १९९० मध्ये किमान वेतन म्हणून २० रुपये मिळायला हवे होते. त्या प्रमाणे महाराष्ट्रातील शेतमजुरांचे किमान वेतन ठरविताना सध्याच्या परिमंडळानुसार परिमंडळ ४ चे वेतन रु. २०-०० ठरते याच न्यायाने अन्य परिमंडळाची किमान वेतने खाली दर्शविल्याप्रमाणे होतील.

| परिमंडळ | सध्याचे किमान वेतन | डिसेंबर ९० मध्ये होणारे किमान वेतन |
|---|---|---|
| १ | रु.२० | रु.३३ |
| २ | रु.१६ | रु.२७ |
| ३ | रु.१४ | रु.२३ |
| ४ | रु.१२ | रु.२० |

ग्रामीण मजूर राष्ट्रीय आयोगाच्या दर सहामहिन्यानी वाढणाऱ्या महागाईनुसार खास भत्ता द्यावयाचा आहे. केंद्रीय स्तरांवरील मजुरांसाठी निर्देशांकाप्रमाणे वाढलेल्या महागाईची भरपाई प्रत्येक वाढलेल्या निर्देशांकामागे रु. १-६५ दरमहा या दराने केंद्र सरकार करते. दर महिन्याचे २६ कामाचे दिवस धरून हिशेब केला तर एका निर्देशांकाला प्रत्येक दिवसाला ६.१/२ पैसे येतात. पण दरमहिन्याचे ३० दिवस धरून हिशेब केला तर एका निर्देशांकाला प्रत्येक दिवसाला ५.१/२ पैसे येतात. महाराष्ट्र राज्यात बांधकाम कामगाराना प्रत्येक वाढीव निर्देशांकास प्रति पॉईंट ५ पैसे सध्या देण्यात येतात. वर दर्शविलेल्या केंद्र सरकारच्या हिशेबाशी हे जवळपास जुळते आहे. जानेवारी ९१ ते जुन ९२ च्या कालावधीत ती सहामाया होतात. या प्रत्येक सहामाहिमध्ये वाढलेल्या निर्देशांकाचा विचार केला तर प्रती पॉईंट ५ पैसे या हिशेबाने देय महागाई भत्ता खालील प्रमाणे होईल.

| तपशील | जाने ९१ ते जुन ८१ | जुलै ९१ ते डिसेंबर ९२ | जानेवारी ९२ ते जुन ९३ |
|---|---|---|---|
| वाढलेला निर्देशांक | ६७ पॉईंट | १० पॉईंट | ६७ |
| महागाई भत्ता | रु.३-३५ | ५-३५ | ३-३५ |

प्रत्येक परिमंडळासाठी वर उल्लेख केलेल्या तीन सहा महिन्याच्या प्रत्येक कालावधीसाठी शेतमजुराना मिळायला पाहिजे असा महागाई भत्ता खालील प्रमाणे होईल.

कालावधी जानेवारे ९१ ते जुन ९१ @ ३-३५

| | परिमंडळ १ | परिमंडळ २ · | परिमंडळ ३ | परिमंडळ ४ |
|---|---|---|---|---|
| डिसेंबर ९० | ३३-०० | २७-०० | रु.२३-०० | रु.२०-०० |
| | ३-३५ | ३-३५ | ३-३५ | ३-३५ |
| | ३६-३५ | ३-३५ | २६-३५ | २३-३५ |

कालावदी जुलै ९१ ते डिसेंबर ९१ @ रु.५-३५

| | परिमंडळ १ | परिमंडळ २ | परिमंडळ ३ | परिमंडळ ४ |
|---|---|---|---|---|
| डिसेंबर ९० | ३३-०० | २७-०० | २३-०० | २०-०० |
| | + ३०-३५ | + ३-३५ | + ३-३५ | + ३-३५ |
| | + ५-३५ | + ५-३५ | + ५-३५ | + ५-३५ |
| | ४१-७० | ३५-७० | ३१-७० | २८-७० |

कालावधी - जानेवारी ९२ ते जुन ९२ @ रु.३-३९

| | परिमंडळ १ | परिमंडळ २ | परिमंडळ ३ | परिमंडळ ४ |
|---|---|---|---|---|
| डिसेंबर ९० | ३३-०० | २७-०० | २३-०० | २०-०० |
| | + ३०-३५ | + ३-३५ | + ३-३५ | + ३-३५ |
| | + ५-३५ | + ५-३५ | + ५-३५ | + ५-३५ |
| | + ५-३५ | + ५-३५ | + ५-३५ | + ५-३५ |
| | ४५-०५ | ३९-०५ | ३५-०५ | ३२-०५ |

किमान वेतनाची फेररचना करायची झाल्यास त्यासाटी समिती नेमून तीचा अहवाल येईपर्यंत वाट पहावी लागणार आहे..मागील दोन किमान वेतन पुनर्निधारण समितीचा अनुभव लक्षात घेता अहवाल तयार करून शिफारशी करण्यामध्ये आणि समितीने शिफारशी केल्यावर त्यावर शासनाकडून निर्णय व्हायला खुप विलंब लागतो.८८ पासून ९३ पर्यंतची भरमसाठ वाढलेली महागाई, ग्रामीण मजूर राष्ट्रीय आयोगाची या बाबतची शिफारस महाराष्ट्रातील शेतमजूरांमध्ये खदखदणाऱ्या असंतोषाचा विचार करून आणि शेतमजूराकडे माणुसकीच्या दृष्टीकोणातून सहानुभुतीने पाहून किमान वेतनाच्या फेररचनेची वाट न पहाता सरळ जाहिरनामा काढून वर नमूद केल्याप्रमाणे किमान वेत आणि महागाई भत्ता देण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घोषित करावा या निर्णयाची अंमलबजावणी २ ऑक्टोबर १९९२ महात्मा गांधी जयंतीपासून करावी अशी मागणी शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समिती महाराष्ट्र करीत आहे.

**संघटित व्हा । संघटित व्हा । एकजूट करा.**
**व्याप्ति आणा लोकशाही पद्धतीने सामर्थ्य संपादून ताबडतोबीच्या व अखेरीच्या लढाईसाठी सिद्ध व्हा !**

**शेतमजूर रोजगार हमी कामगार समन्वय समिती ! (महाराष्ट्र राज्य)**

# संघटित व्हा । संघटित व्हा । एकजूट करा.

व्याप्ति आणि लोकशाही पद्धतीने सामर्थ्य संपादून ताबडतोबीच्या व
अखेरीच्या लढाईसाठी सिद्ध व्हा !

# शेतमजूर रोजगार हमी कामगार समन्वय समिती ! (महाराष्ट्र राज्य)

किमत तीन रुपये

छपाई : श्री मुरारी ऑफसेट प्रिंटर्स, कोल्हापूर / फोन : २३५०७

प्रकाशक—
कॉ. संतराम पाटील, कोल्हापूर